नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

www.dainikmahasagar.in / Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५० * अंक २७७ * * अमरावती * गुरुवार, दिनांक ३ एप्रिल २०२५ | ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.)

संपर्क
संपादकीय : 9922970023; वितरण : 8888647753
जाहिरात : 7447735851 / 9326906062
नागपूर कार्यालय संपर्क : 7447735851
नागपूर मुख्य कार्यालय : कॉटन मार्केट, नागपूर – 440018



महासागर | NAGPUR POST
महासागर व NAGPUR POST ची जोडी, वाचतांना येईल वाचनाची गोडी
महासागर (मराठी) आणि NAGPUR POST (English)
घरपोच पाठविण्याची सुविधा.
महासागर किंमत Rs. 3
Nagpur Post Rs. 3 = 6
4 रुपयात


## बनावट कंपनीच्या नावे १०४ कामगारांची फसवणूक

■ **वृत्तसंस्था, पुणे, दि. २ :**
पुण्यात एका धक्कादायक प्रकरणाचा पदार्फाश झाला आहे. प्रत्यक्षात अस्तित्वात नसलेल्या कंपनीच्या नावे १०४ कामगारांची फसवणूक करण्यात आली. श्री गणेश एंटरप्रायजेसचे मालक सीताराम ठकाणसिंग यांच्याविरुद्ध वानवडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ठकाणसिंग यांनी २३ डिसेंबर २०२० रोजी भविष्य निर्वाह निधी कार्यालयाच्या संकेतस्थळावर श्री गणेश एंटरप्रायजेस या फर्मची नोंदणी केली. कार्यालयाकडून सांकेतिक क्रमांक मिळाल्यानंतर त्यांनी १०४ कामगारांच्या नावे ऑनलाइन पद्धतीने पीएफ खाती उघडली. मात्र, संमतीशिवाय बनावट पीएफ खाती उघडल्याचे समोर आले.

अग्रग्रलेख

## खरीखरी..

# वक्फ आणि गदारोळ

आज लोकसभेत बहुप्रतिक्षीत वक्फ बिल सरकारने पेश केले. ही खरीखरी लिहीपर्यंत लोकसभेत अजूनही घमासान सुरू आहे. मतदानाचे आकडे मतदान न झाल्यामुळे बाहेर येण्याचा प्रश्नच नाही. हे वक्फ बिल पास करण्यासाठी ज्या बहुमताची गरज होती. ते कदाचित सत्ताधारी एनडीएला मिळाले असेल. म्हणजेच एनडीएतील अनेक पक्ष मुस्लिमांच्या मतांवर निवडून आलेले होते. त्यांच्याकडून पक्की गॅरंटी घेतल्याशिवाय हे बिल पेश केले गेलेच नसते?. गेल्यावेळी लोकसभेत हे बिल पारित करण्यात आलेच नव्हते. यानंतर हरियाणा आणि महाराष्ट्र ही दोन राज्ये जिंकल्यावर हे बिल विश्वासाने सादर करण्यात आलेले आहे. हे बिल केवळ लोकसभेचे पारित केले. तरी त्याचे कायद्यात रूपांतर होत नाही. राज्य सभेमध्येही या बिलाला अनुमोदन दिले गेले पाहिजे. तेव्हाच त्याचे कायद्यात रूपांतर होईल. आजच्या घडीला एनडीए जवळ 296 खासदारांचा पाठिंबा आहे. विरोधी पक्षाने एनडीए मधील एकाही पक्षाला आपल्याकडे वळवण्याचा प्रयत्न केला नाही किंवा एकही पक्ष त्यांच्याकडे वळू शकलेला नाही. चंद्राबाबू नायडूंचे 16 खासदार, नितीश बाबूंचे 12 खासदार आणि पासवानांचे पाच खासदार हे सर्वजण मिळून या बिलाचा निषेध करतील. असे मनाचे मांडे विरोधी बाकावरच्या खासदारांकडून खाल्ले जात होते. पण चाणक्य असलेल्या अमित शहा यांनी चाणाक्षपणे नितीश बाबू आणि चंद्राबाबू यांच्याकडून पक्की खात्री करून घेतली होती. तिकडे राज्यसभेत 121 मते एनडीएला हवी आहेत. एनडीए जवळ 125 च्या आसपास आकडा आहे असे म्हणतात. म्हणजे राज्यसभेतही हे बिल नाकारले जाणार नाही याची शाश्वती आहे. आपल्या देशात सरकार आणि रेल्वे यानंतर सर्वाधिक जमीन असलेली संस्था म्हणजे वक्फ बोर्ड आहे. आपल्या हिंदुस्थानावर ठीकठिकाणी अनेक बादशहा किंवा निजाम यांनी राज्य केले. त्यासोबतच नबाबांचेही राज्य होते. त्यांनी किंवा त्यांच्या सरदारांनी या वक्फसाठी मोठमोठ्या जमिनी दिलेल्या आहेत. बहुसंख्य असलेला गरीब मुस्लिम समाज या संपत्तीचे फक्त दूरदर्शन करू शकतो. पण या बोर्डात दादागिरी चालते ती फक्त श्रीमंतांचीच, असेही म्हणतात. या बोर्डाच्या जमिनी बाबत अनेक विवाद आहेत. त्यामुळेच आता काही धार्मिक मुस्लिम नेते या बिलाचे समर्थन करताना दिसतात. एका साध्या मुस्लिमाने तर वक्फमुळे अनेक भूमाफिया तयार झालेले आहेत. असा थेट आरोप केलेला आहे. वक्फ बोडार्ची कमिटी 22 लोकांची असते. आता त्यात दहा मुस्लिम आणि 12 गैर मुस्लिम असतील. यावर अनेक मुस्लिम नेत्यांचा विरोध आणि रोष आहे. ही आमच्या धार्मिक कारभारात सरकारची लुडबुड आहे, असे संबंधित लोक म्हणतात. सरकारने हे आरोप फेटाळून लावलेले आहेत. आता हे विधेयक मंजूर झाल्यावर देशभरातील वक्फ भूमीचे सम्राट निश्चितच मुक्तभोगी ठरतील. त्यामुळे 'आले सरकारजींच्या मना, तेथे कोणाचेच चालेना' या उक्तीप्रमाणे सरकारची हे बिल पास करण्याची युक्ती सफल होणार आहे. याबद्दल शंका घेण्याचे कारण नाही. कारण लोकसभेत कितीही गदारोळ झाला. तरी बहुमत एनडीएकडे आहे. त्यामुळे लोकसभेतील गदारोळ म्हणजे अरण्यरुदन ठरेल असे वाटते. देशभरात या विषयावर काय प्रतिक्रिया उमटतात. ते लवकरच दिसून येईल. तोपर्यंत 'तुका म्हणे उगी राहा, जे जे होईल ते ते पाहा'!


nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023


## वक्फ सुधारणा विधेयकावर

# लोकसभेत चर्चा



■ **वृत्तसंस्था**
**नवी दिल्ली, दि. १ :**
बहुचर्चित वक्फ दुरुस्ती विधेयकावर बुधवारी लोकसभेत चर्चा करण्यात आली . सरकारच्या वतीने गृहमंत्री अमित शहा यांच्यासह अनेक मंत्र्यांनी आपली बाजू मांडली, दुसरीकडे, विरोधकांनी या विधेयकाला विरोध कायम ठेवला असून, काही विरोधी पक्षांनी बहिर्गमन केले.

अल्पसंख्याक व्यवहार मंत्री किरेन रिजिजू यांनी बुधवारी लोकसभेत वक्फ दुरुस्ती विधेयक २०२४ सादर केले. रिजिजू यांनी याला उम्मीद (युनिफाइड वक्फ मॅनेजमेंट एम्पॉवरमेंट, एफिशियन्सी अँड डेव्हलपमेंट) असे नाव दिले आहे.

या विधेयकाला केंद्र सरकारचा भाग असलेल्या टीडीपी, जेडीयू आणि एलजेपी यांनी पाठिंबा दिला. शिवसेना यूबीटी खासदार अरविंद सावंत यांनी त्यांच्या भाषणात हे स्पष्ट केले नाही की ते विधेयकाच्या बाजूने आहेत की विरोधात आहेत.

गृहमंत्री अमित शहा म्हणाले की, वक्फमध्ये गैर-इस्लामी गोष्टींना परवानगी दिली जाणार नाही. अशी कोणतीही तरतूद नाही. मतपेढीसाठी अल्पसंख्याकांना घाबरवले जात आहे.

शहा म्हणाले, २०१३ मध्ये लालू प्रसाद म्हणाले होते वक्फमध्ये काम करणाऱ्या लोकांनी त्यांच्या मोठमोठ्या जमिनी विकल्या आहेत. त्यांनी पाटण्यातील डाक बंगलाच बळकावला. भविष्यात कठोर कायदे आणावेत अशी आमची इच्छा आहे. चोरी करणाऱ्यांना तुरुंगात पाठवले पाहिजे. त्यांनी (काँग्रेसने) लालूजींची इच्छा पूर्ण केली नाही, मोदीजींनी ती पूर्ण केली.

विधेयकावरील चर्चेदरम्यान रिजिजू यांनी ५८ मिनिटे भाषण दिले. ते म्हणाले की, काँग्रेसच्या नेतृत्वाखालील यूपीए सरकारने ५ मार्च २०१४ रोजी १२३ प्रमुख मालमत्ता दिल्ली वक्फ बोडार्ला हस्तांतरित केल्या होत्या. लोकसभा निवडणुकीच्या अगदी आधी अल्पसंख्याक मतांसाठी हे करण्यात आले होते, परंतु निवडणुकीत पराभव झाला.

रिजिजू म्हणाले, जर आपण आज हे दुरुस्ती विधेयक सादर केले नसते, तर आपण ज्या इमारतीत बसलो आहोत ती इमारतदेखील वक्फ मालमत्ता असल्याचा दावा करू शकली असती. जर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे सरकार सत्तेत आले नसते तर इतर अनेक मालमत्तादेखील अधिसूचित झाल्या असत्या.

दुसरीकडे, मुस्लिम पर्सनल लॉ बोर्डाने स्पष्ट शब्दात इशारा दिला असून, जर विधेयक मंजूर झाले तर आम्ही देशभर निषेध करू असे म्हटले आहे.

## शेगाव-खामगाव महामार्गावर तिहेरी अपघात

# ६ ठार, १७ जखमी





■ **छगनलाल खंडेलवाल, खामगाव, दि. १ :**
बुलढाणा जिल्ह्यातील शेगाव-खामगाव महामार्गावर एक तिहेरी अपघात घडला आहे. या भीषण अपघातात ६ जणांचा मृत्यू झाल्याची माहिती पुढे आले आहे. एसटी-कार आणि ट्रॅव्हल्सच्या अपघातात १७ हून अधिक जण जखमी आहेत.

बुलढाणा जिल्ह्यातील खामगाव-शेगाव मार्गावर जयपूर लांडे फाट्यासमोर आज सकाळी साडेपाचच्या सुमारास भरधाव कार एसटी बसवर धडकली. त्यानंतर पाठीमागून येणारी खाजगी प्रवासी बस ही या अपघातग्रस्त वाहनांना धडकली. या तिहेरी अपघातामुळे रस्त्यावर एकच गोंधळ उडाला. या भीषण अपघातात ६ जणांचा मृत्यू झाला असून १७ जण जखमी आहेत. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पुढील कारवाई सुरू केली आहे. जखमींवर खामगाव रुग्णालयात उपचार सुरू आहेत. अपघातातील भरधाव बोलेरो शेगावकडून कोल्हापूरकडे जात होती. याच वेळी एक एसटी महामंडळाची बस जी पुण्याकडून परतवाडाकडे जात होती. अशातच एक खासगी प्रवासी वाहतूक बस या दोन अपघातग्रस्त वाहनांना धडकली. हा अपघात इतका भीषण होता की यात ६ जणांचा मृत्यू झाला आहे.

जखमीमधील ७ जणांची प्रकृती गंभीर असल्याची माहिती पुढे आली आहे. अपघातामध्ये खाजगी लक्झरी बस चालकाचा वाहक केबिनमध्येच अडकला होता एक तासाच्या प्रयत्नानंतर त्याला बाहेर काढण्यात यश आले. हा अपघात इतका भीषण होता की यातील तीनही वाहनांचा चुराडा झाला आहे.

अपघातामध्ये बोलेरो मधील धनेश्वर मरावी रा. मध्य प्रदेश, कृष्णकुमार मोहन सिंह सरोते (वय २०) वर्ष, शिवाजी समाधान मुंडे (वय ५५) रा. एसबीआय कॉलनी शेगाव, शिवपाल संतकुमार संयम (वय २१) रा. मध्यप्रदेश, रंजीत वानखेडे (वय ४०), रा. मूर्तिजापूर व इंद्राणी ट्रॅव्हल्स मधील मेहरुनिसा शेख हबीब (वय ४५) रा. धुळे मालेगाव यांचा मृत्यू झाला.

घटनेची माहिती मिळताच खामगाव शहर पोलिस स्टेशनचे ठाणेदार रामकृष्ण पवार, शिवाजी नगर पोस्टेचे ठाणेदार पितांबर जाधव, शेगाव ग्रामिणचे ठाणेदार आपल्या सहकार्यांसह घटनास्थळी पोहचले होते. त्यांनी जखमींना मदतीचा हात देवून खामगाव येथील सामान्य रूग्णालयात आणून उपचारार्थ भरती केले होते.

सदरहू अपघात स्थळी बुलडाणा जिल्ह्याचे जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी भेट दिली तसेच जिल्हा सामान्य रूग्णालयात जावून जखमींची आस्थेने विचारपूस केली तसेच डॉक्टरांना सवोतोपरीने जखमींवर योग्य तो उपचार करावा, असे निर्देश दिले. त्यांच्या समवेत अप्पर पोलिस अधीक्षक डॉ.श्रेणीक लोढा, उपविभागीय अधिकारी रामेश्वर पुरी, तहसीलदार सुनिल पाटील होते. जखमींवर विविध रूग्णालयात उपचार सुरू आहेत. तुकाराम मुंढे यांनी दिलेल्या तक्रारीवरून आरोपी बोलेरो चालक व लक्झरी चालक यांच्या विरूध्द गुन्हा दाखल केला आहे.

# अजित पवारांनी काकांना आशीर्वादापुरते मर्यादित ठेवले

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २ :**
अजित पवारांनी त्यांच्या काकांना आशीर्वादापुरते मर्यादित ठेवले असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे. या माध्यमातून त्यांनी अजित पवार यांना शरद पवार यांना कोपरखळी लगावली आहे.

फडणवीसांची कोपरखळी



तसेच वक्फ बोर्ड सुधारणा विधेयकावरून त्यांनी उद्धव ठाकरे यांना टोला लगावला. बाळासाहेब ठाकरे यांचा अंश जरी बाकी असेल तर उद्धव ठाकरे गटाने या विधेयकाचे समर्थन करण्याची मागणी फडणवीस यांनी केली आहे.

वक्फ बोर्ड सुधारणा विधेयकावर बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, भारतीय संविधानामध्ये धर्मनिरपेक्ष हा शब्द वापरला गेला आहे. त्याच प्रत्यंतर आपल्याला या बिलामध्ये पाहायला मिळत असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी म्हटले आहे. या संदभार्तील कायद्यामध्ये अमर्याद अधिकार होते. चुकीच्या पद्धतीने निर्णय झाला तर त्या निर्णया विरोधात न्यायालयात जाण्याची देखील मुभा नव्हती. आता या सुधारणामुळे ती मुभा दिलेली आहे. तसेच चुका सुधारण्याची संधी दिलेली आहे. विशेषतः महिलांना प्रतिनिधित्वाची संधी मिळाली असल्याचे फडणवीस म्हणाले . देशातून तीन तलाक हद्दपार झाल्यानंतर मुस्लिम महिलांना देखील यात प्रतिनिधित्व मिळत आहे. हे अतिशय पुरोगामी पाऊल असून, हे विधेयक कोणत्याही समाजाच्या विरोधात नाही, असा दावा देवेंद्र फडणवीस यांनी केला आहे.

## ३६ पैकी ३२ जातपडताळणी समित्यांचा

# अध्यक्षाविनाच कारभार

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २ :**
डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) अंतर्गत राज्यातील ३६ पैकी ३२ जातपडताळणी समित्यांवर पाच महिन्यांपासून अध्यक्षच नसल्याने जातवैधता प्रमाणपत्रांची तब्बल ५६ हजार २०७ प्रकरणे प्रलंबित आहेत. नवे शैक्षणिक वर्ष दोन महिन्यांवर असून यात सर्वाधिक ८८ टक्के म्हणजे ४९ हजार ५६६ प्रकरणे शैक्षणिक आहेत.

पाच महिन्यांपूर्वी ३६ पैकी १४ समित्यांवर अध्यक्ष होते, परंतु यातीलही १० जणांची अतिरिक्त जिल्हाधिकारी पदावर (निवड श्रेणी, आयएएस) निवड झाल्याने आता केवळ चार समित्यांवर अध्यक्ष उरले आहेत. त्यामुळे रिक्त पदांचा अतिरिक्त कार्यभार कार्यरत अध्यक्षांकडे सोपवण्यात आल्याने अर्ज प्रलंबित राहत आहेत.

३६ पैकी ३० समित्यांचे अध्यक्ष महसूल तर ६ समित्यांचे अध्यक्ष सामाजिक न्याय विभागातून भरायचे असतात. सध्या या दोन्ही विभागांतील एकही अधिकारी अध्यक्ष नाही. ग्रामविकासमधील एक, मंत्रालय केडरमधून २ तर १ अधिकारी अतिरिक्त कार्यभार सांभाळत अध्यक्षपदावर काम करत आहे.

याबाबत विधिमंडळात १९ मार्चला तारांकित प्रश्न उपस्थित करण्यात आला होता. यावर बोलताना समाजकल्याणमंत्री शिरसाट म्हणाले होते, सामान्य प्रशासन विभागाने अध्यक्षांची तीन पदे मंत्रालयीन विभागातील सहसचिव संवर्गातील अधिकाऱ्यांमधून प्रतिनियुक्तीने भरण्यासाठी ३१ जानेवारी रोजी माहिती मागवली आहे.

महसूल विभागाकडून २५ फेब्रुवारीला २९ अपर जिल्हाधिकारी (निवड श्रेणी) संवर्गातील अधिकाऱ्यांची जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती अध्यक्षपदी पदस्थापना केली आहे, असे समाजकल्याणमंत्री संजय शिरसाट यांनी उत्तर देताना सांगितले . परंतु प्रत्यक्षात यापैकी एकही अधिकारी आधीच्या पदावरुन कार्यमुक्त न केल्याने रुजू होऊ शकलेला नाही. परिणामी, या समित्यांचे काम हवेत सुरू आहे.

**अध्यक्ष लवकरच पदभार स्वीकारणार**

आतापर्यंत केवळ चारच अध्यक्ष राज्यभरातील समित्यांवर कार्यरत आहेत. मात्र, आता मी प्रत्येक जिल्हा समितीला अध्यक्ष नियुक्तीसाठी सूचना केली आहे. त्यामुळे प्रत्येक समितीला अध्यक्ष मिळणार आहे. कोणत्याही अधिकाऱ्यांचे बदलीचे विनंती अर्ज किंवा पदभार स्वीकारत नसल्याचे कारण ऐकले जाणार नाही, अशी स्पष्ट सूचना करण्यात आली आहे. यामुळे त्यांना समितीचा पदभार स्वीकारावाच लागेल. सर्व अध्यक्ष पदभार स्वीकारणार आहेत.

**संजय शिरसाठ, मंत्री**

## फटाका कारखान्यात स्फोट

# मृत्यूसंख्या २१ वर

■ **वृत्तसंस्था, हरदा, दि. १ :**
गुजरातमधील एका फटाक्याच्या कारखान्यात बॉयलरचा स्फोटातील मृत्यूसंख्या २१ वर पोहचली आहे. स्फोटात एकाच कुटुंबातील ११ जणांचा मृत्यू झाला . मंगळवारी सकाळी ८ वाजता बनासकांठाजवळील डीसा येथे हा दुर्घटना घडली. ३ जणांची प्रकृती गंभीर आहे.

सर्व कामगार हरदा जिल्ह्यातील हंडिया आणि देवास जिल्ह्यातील संदलपूर गावातील रहिवासी होते. हे सर्वजण फक्त २ दिवसांपूर्वीच गुजरातमध्ये कामासाठी आले होते. स्फोट झाला तेव्हा कामगार फटाके बनवत होते. स्फोट इतका भीषण होता की अनेक कामगारांच्या शरीराचे अवयव ५० मीटर अंतरापर्यंत विखुरले गेले. कारखान्याच्या मागे असलेल्या शेतात काही मानवी अवयवही सापडले आहेत. आग आटोक्यात आणण्यासाठी अग्निशमन दलाला ५ ते ६ तास लागले.

गुजरातमधील फटाक्याच्या कारखान्यातील दुर्घटनेनंतर, राज्य सरकारचे अनुसूचित जाती कल्याण मंत्री नागर सिंह चौहान बनासकांठा येथे रवाना झाले आहेत. दरम्यान, हरदाचे जिल्हाधिकारी आदित्य सिंह म्हणाले की, मृतांची ओळख पटविण्यासाठी आणि जखमींना मदत करण्यासाठी अधिकाऱ्यांची एक टीम पाठवण्यात आली आहे. या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी सुरू झाली आहे.




# धनंजय मुंडे पंकजांची राजकीय सुपारी घेऊन आले होते

## अंजली दमानिया यांचा दावा



■ **मुंबई :** पंकजा मुंडेंची सुपारी घेऊन धनंजय मुंडे आपल्याकडे आले होते, असा दावा सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी केला आहे. या प्रकरणी पंकजा मुंडे यांना प्रश्न विचारला असता त्यांनी यावर बोलण्याचे टाळले आहे.

दरम्यान अंजली दमानिया यांनी केलेल्या आरोपामध्ये काहीही तथ्य नाही. मी त्यांच्या घरी गेलेलो नाही, असे म्हणत घनवट यांनी त्यांचे आरोप फेटाळले आहेत. दुसरीकडे संतोष देशमुख हत्या प्रकरणी धनंजय मुंडे अडचणीत असताना पंकजा मुंडे यांनी त्यांच्याविरोधात एक शब्दही काढला नाही. उनट राजीनामा घेतला तेव्हा निर्णय घेण्यास उशिरच झाला असे म्हटले.

अंजली दमानिया म्हणाल्या की, ४-५ वषार्पूर्वी धनंजय मुंडे स्वतः माज्या घरी तेजस ठक्कर नावाच्या व्यक्तीसह आले होते. त्यांनी अख्खा फाईल्सचा बंच आणला होता. पंकजा मुंडेंविरोधातल्या या फाईल्स होत्या. त्या फाईल्सची माहिती दिली. त्याआधी मला तेजस ठक्कर, राजेंद्र घनवट यांचा फोन आला होता. जेव्हा धनंजय मुंडे माज्याकडे फाईल्स घेऊन आले तेव्हा मी अशा दिलेल्या फाईल्सवर कधीही काम करत नाही हे समजावले. त्यामुळे मी पंकजा मुंडे यांचा कुठलाही विषय मी त्यावेळी लावून धरला नव्हता असे त्यांनी सांगितले.

# ट्रकच्या धडकेत दुचाकीस्वार ठार संतप्त जमावाने ट्रक पेटवला



**रत्नागिरी :** ट्रकने दुचाकीस्वाराला ४०० फूट फरफटत नेल्याची अंगावर काटे आणणारी घटना रत्नागिरी जिल्ह्यातील निवळी - जयगड मार्गावर घडली आहे. या घटनेत दुचाकीवरून तरुणाचा जागीच मृत्यू झाला. ट्रक चालकाच्या निष्काळजीपणामुळे ही घटना घडल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे संतप्त जमावाने या मार्गावरील वाहतूक अडवून धरत सदर ट्रक पेटवून दिला.

यासंबंधीच्या माहितीनुसार, किरण कृष्णा पागदे (४०) असे मृत तरुणाचे नाव आहे. तो रत्नागिरीच्या चाफेरी गावचा रहिवासी आहे. तो आपल्या दुचाकीवरून जयगडच्या दिशेने जात होता. तेव्हा सहाचाकी ट्रकने त्याला जोराची धडक दिली. या घटनेनंतर आरोपी ट्रकचालक संघर्ष सुशांत अंबागडे (२४, नागपूर) याने आपला ट्रक थांबवला नाही. त्याने किरणला तसेच जवळपास ४०० फूट अंतरापर्यंत फरफटत पुढे नेले. त्यात किरण जागीच ठार झाला. सदर ट्रक हा नागपूरहून जयगड स्थित जेएसडब्ल्यू कंपनीच्या दिशेने जात होता.

ही घटना निवळी -जयगड मार्गावरील चाफेरी लगत घडली. या घटनेनंतर संतप्त जमावाने या मार्गावरून होणाऱ्या अवजड वाहतुकीविरोधात निदर्शनेही केली. संतप्त जमावाने ट्रक पेटवून दिला. यामुळे काही काळ परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले.

# पतीचा खून करणाऱ्या पत्नीसह तिच्या प्रियकराला अटक

**पुणे :** लोणीकाळभोर परिसरात वडाळे वस्ती येथील रायवाडी येथे एक एप्रिल रोजी एक अज्ञात व्यक्ती जखमी व बेशुध्द अवस्थेत पडला असल्याची माहिती पुणे पोलिसांच्या नियंत्रण कक्षाला समजली होती. त्याआधारे लोणीकाळभोर पोलिसांनी सदर ठिकाणी जाऊन पाहणी केली असता त्यांना, रविंद्र काशीनाथ काळभोर (४५) हा मृतावस्थेत दिसला. पोलिसांनी तपास केला असता, पत्नीने अनैतिक संबंधात पती अडथळा ठरत असल्याने, प्रियकराच्या मदतीने तिचा निघृण खुन केल्याचे निष्पन्न झाल्याची माहिती पोलिस उपायुक्त राजकुमार शिंदे यांनी दिली आहे.

याप्रकरणी पत्नी शोभा रवींद्र काळभोर (४२) व गोरख त्र्यंबक काळभोर (४१) या आरोपींना अटक करण्यात आली आहे. शोभा काळभोर व गोरख काळभोर यांना पोलिसांनी ताब्यात घेऊन त्यांच्याकडे सखोल चौकशी केल्यावर, आरोपींनी एकमेकात संगनमत करुन अनैतिक संबंधात मयत हा बाधा निर्माण करत असल्याने त्याचा राहते घराचे बाहेर झोपला असताना, त्याचे डोक्यात लाकडी दांडक्याने वार करुन त्यास गंभीर जखमी करुन जीवे ठार मारले असल्याचे निष्पन्न झाले आहे. अनैतिक संबंधात अडसर ठरत असलेल्या पतीला त्याच्या पत्नीने प्रियकराच्या मदतीने संपविल्याचे तपासात समोर आले.

# दिशा सालियन प्रकरण आता दुसऱ्या न्यायपीठासमोर सुनावणी



■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. २ :**
दिशा सालियन प्रकरणात रजिस्टारच्या चुकीमुळे अधिकार नसलेल्या पीठासमोर हे प्रकरण सुनावणीसाठी लागले होते. वास्तविक हे प्रकरण सारंग कोतवाल यांच्या पीठासमोर लागायला पाहिजे होते. मात्र, आता न्याय पिठाने हे प्रकरण कोतवाल यांच्या पीठासमोर पाठवण्याचे आदेश दिले असल्याची माहिती ॲड. नीलेश ओझा यांनी दिली आहे. त्यामुळे आता या प्रकरणाची सुनावणी दुसऱ्या पीठासमोर होणार आहे.

हे प्रकरण मुख्य न्यायमूर्तींच्या पीठासमोर जायला हवे असे आम्हाला देखील वाटते. मात्र या संदर्भात काही सकारात्मक गोष्टी झाल्या आहेत. आमच्या मागण्याला सरकारचे समर्थन असल्याचे नीलेश ओझा यांनी म्हटले आहे.

या संदर्भात सरकारी वकिलांसोबत माझी चर्चा झाली आहे. या प्रकरणात याचिकेतील मागण्यांना सरकारचे देखील समर्थन असल्याचे सरकार न्यायालयात सांगणार आहे. आमच्या अनेक मागण्या सरकारने मान्य केल्या आहेत. त्यामुळे आम्ही सरकारच्या विरोधात बोलणार नाही, असे देखील ॲड. नीलेश ओझा यांनी म्हटले आहे. या प्रकरणात आम्हाला गुन्हा क्रमांक हवा आहे. यावरच आता सरकार आणि आमच्या चर्चा सुरू आहे. दुसरा आमच्यात कोणत्याही मतभेदाचा मुद्दा नसल्याचे त्यांनी म्हटले आहे.

दिशाच्या मृत्यूच्या प्रकरणाची सुनावणी आज मुंबई उच्च न्यायालयात झाली. दिशाचे वडील सतीश सालियन यांनी उच्च न्यायालयात सीबीआय चौकशीची मागणी करणारी याचिका दाखल केली आहे, ज्यात आदित्य ठाकरेंसह चार प्रमुख व्यक्तींविरुद्ध चौकशीचे आवाहन करण्यात आले आहे.

# चुलत्याच्या कृपेने बरं चाललंय..

## अजित पवार यांचे सर्वात मोठे विधान



■ **वृत्तसंस्था, बीड, दि. २ :**
राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार आज बीड दौऱ्यावर असून तेथे त्यांनी विविध कामांचा आढावा घेतला. त्यानंतर त्यांनी बीडमधील स्थानिक नेते, कार्यकर्ते, पदाधिकारी यांची भेट घेत संवाद साधला. युवा संवाद मेळाव्यातील भाषणामधून अजित दादांनी कार्यकर्त्यांना, युवा नेत्यांनाही संबोधित केलं. अनुभवाचे, उपदेशाचे चार बोल ऐकवत अजित पवारांनी यावेळी कार्यकर्त्यांना काही कानपिचक्याही दिल्या.

प्रचार प्रसार आणि संघटन मजबूत करण्यासाठी काय काय करावे याच्या मार्गदर्शक सूचनाही अजित दादांनी दिल्या. मात्र या भाषणादरम्यान त्यांनी तूफान फट-केबाजीही केली. कर्मधर्म संयोगाने, आईवडिलांच्या कृपेने, चुलत्याच्या कृपेने बरं चाललंय आमचं, असं विधान अजित पवार यांनी केलं. आपल्या यशाचे सर्व श्रेय अजितदादांनी शरद पवार यांनाच दिल्याने राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आलं आहे.

सुमारे २ वर्षांपूर्वी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये फूट पडली. अजित पवार यांनी शरद पवारांची साथ सोडली आणि ते महायुतीत सामील झाले. या फुटीमुळे प्रचंड गदारोळ झाला, खळबळ माजली. त्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नाव आणि चिन्ह अजित पवारांना मिळालं, आणि दोघांमधील अंतर वाढतच गेलं. लोकसभा निवडणुकीतही सुप्रिया सुळेंविरोधात अजित पवार यांनी त्यांची पत्नी सुनेत्रा पवार यांना उभं केलं. मात्र त्यांचा पराभव झाला.

काही काळापासून शरद पवार आणि अजित पवार हे वेगवेगळ्या कार्यक्रमानिमित्त बऱ्याचदा एका मंचावर आले होते, पण ती फक्त औपचारिकच भेट होती. मात्र दोन्ही पक्षात पडलेली फूट, मनातील अंतर या सर्वांच्या पार्श्वभूमीवर आज अजित पवारांनी अचानक हे विधान करत शरद पवारांची आठवण काढल्याने अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत.

युवा संवाद मेळाव्यात अजित पवारांनी तरूणांना मार्गदर्शन केलं. युवकांचे प्रश्न, बेरोजगारी, शिक्षण, व्यवसाय आणि शेतकऱ्यांच्या समस्यांवर काम करण्यासाठी युवकांचे संघटन नीट असलं पाहिजे. काही लोक भेटले ते म्हणाले बीडमध्ये काही चांगल्या गोष्टी करायच्या आहेत. त्यांनी केल्या. मला निवेदन दिलं, मी त्यांना समर्थन दिलं. अधिकारी त्यांचे काम करत आहेत, तुम्ही तुमचे काम करा. गाव पातळीपर्यंत आपलं संघटन गेलं पाहिजे. लोकांच्या फक्त समस्या ऐकू नका, त्यांच्या चर्चांवर मार्ग काढा. त्या समस्या सोडवा, असा सल्ला अजित दादांनी दिला.

**सर्वांची अंडीपिल्ली बाहेर येतात**

प्रचार प्रसार आणि संघटन मजबूत करण्यासाठी डीजिटलचा वापर करा. पण चांगल्या कामासाठी करा, असं अजित पवार म्हणाले. काही वेळा सोशल मीडियातून एखादी व्यक्ती दुसऱ्या समाजाची असेल तर दुसरा माणूस त्याला चुकीचं काही तरी बोलतो. व्हॉट्सअप पाठवतो, हे करू नका. आमचे नेते पदावर बसले आहेत. आमचं कोण काय करणार असं मनात आणू नका.

टेक्नॉलॉजी खूप पुढे गेली आहे. तुम्हाला वाटत असेल मी मेसेज डीलिट केला. कोण काय करणार. पण तुमचा फोन ताब्यात घेतल्यानंतर तुम्ही कुणाला काय व्हॉट्सअप केलं ते सर्व रेकॉर्ड समोर येतं, असं अजित पवार म्हणाले. ते सर्व फोटो, मेसेज रिकव्हर होतात. ग्रामीण भागात सर्वांची अंडीपिल्ली बाहेर येतात. मी फार पोहोचलेलो आहे, असे विचार मनात आणू नका, असेही त्यांनी सांगितलं.

**याला टायरमध्ये घ्या, ठोकून काढा**

जर तुम्ही यात अडकला तर मी सोडवायला पुढे येणार नाही. मी उलट पोलिसांना सांगेन, याला टायरमध्ये घ्या. याला ठोकून काढा. हे असं नाही चालणार. मी काहींना तर मकोका लावायला सांगितलं आहे. मी दादागिरी कुणाचीच खपवून घेणार नाही. सत्ताधारी पक्षाच्या आणि विरोधी पक्षाच्या कार्यकर्त्यांचीही नाही. ज्यांचा राजकारणाशी अर्थाअर्थी संबंध नाही, त्यांचीही दादागिरी खपवून घेणार नाही, असे अजित पवार यांनी यावेळी ठणकावून सांगितले.

# पक्षाची दिशाभूल करत तिकीट वाटले

## चंद्रकांत खैरेंची अंबादास दानवेंवर टीका : ठाकरे गटात दुफळी



■ **वृत्तसंस्था, छ. संभाजीनगर, दि. २ :**
छत्रपती संभाजीनगर येथील शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे माजी खासदार चंद्रकांत खैरे व विधान परिषदेतील विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांच्यातील मतभेद पुन्हा एकदा चव्हाट्यावर आलेत. राजू शिंदे यांनी ठाकरे गटाला सोडचिठ्ठी दिल्यानंतर चंद्रकांत खैरे यांनी दानवे यांच्यावर निशाणा साधत दानवे कोणत्याही प्रकरणात आपल्याला विश्वासात घेत नसल्याचा आरोप केला आहे.

संभाजीनगर जिल्ह्यात उमेदवारी देताना मला विचारणा करण्यात आली नाही. आयात उमेदवार अंबादास दानवेंच्या माध्यमातून मातोश्रीवर जात तिकीट घेऊन आले. अंबादास दानवेंनी त्यांची सेटिंग लावली. पण एकही जण निवडून आला नाही. खासदार तरी आले का निवडून का यांचीच सेटिंग लावून टाकली याची माहिती घ्यावी लागेल, असे खैरे यासंबंधी म्हणालेत.

चंद्रकांत खैरे म्हणाले की, उमेदवारी देताना पक्ष चुकला नाही. तिकीट देताना कधीतरी मागे पुढे होत असते. काही ठिकाणी पक्षाला दिशाभूल करत तिकीट देण्यात आले, असे म्हणत त्यांनी अंबादास दानवे यांचे नाव न घेता टीकास्त्र डागले आहे.

चंद्रकांत खैरे म्हणाले की, अंबादास दानवे हे मला आताही विचारत नाही. जेव्हा मातोश्रीवर बैठक झाली होती तेव्हा त्र्यंबक तुपे यांनी सांगितले की हे सोबत राहिले तर फायदा होईल. त्यावेळी उद्धव ठाकरेंनी सांगितले होते की खैरेंच्या बाबतीत असेल तर मला सांगा आणि दानवेंच्या बाबतीत काही असेल तर त्यांच्या आईला सांगावे.

अंबादास दानवे मला कोणत्या कार्यक्रमाला बोलवत नाही. मी पण शिवसेनेचा नेता आहे. ते आता आले आहेत. अंबादास दानवे केवळ ऑगस्टपर्यंत विरोधी पक्षनेता आहे. जिल्ह्यात एकही तिकीट मला विचारून दिलं गेलं नाही,

चंद्रकांत खैरे म्हणाले की, आगामी जिल्हा परिषद आणि मनपाच्या निवडणुकीसाठी आमचे दौरे सुरू केले आहेत. पण काही जण म्हणत आहे की ह्या निवडणुका 2026 फेब्रुवारीपर्यंत होणार नाही. यासाठी आम्ही तयारी सुरू केली आहे. छत्रपती संभाजीनगरमध्ये यंदा आमचा एक आमदार निवडून आला नाही ना खासदार निवडून आला आहे. भाजप सोबत नसला तरी आम्हाला फरक पडणार नाही हे सांगण्याचा प्रयत्न खैरे यांनी केला आहे.

# मनसे सुरु करणार 'प्रति महापालिका'

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. २ :**
राज ठाकरे यांच्या नेतृत्वातील महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने सर्वसामान्यांच्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी प्रति महापालिका सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. फेक प्रॉब्लेमवर बोलणारे अनेकजण आहेत. त्यासाठी कामरा ते कबरीपर्यंत अनेक मुद्दे आहेत. पण आम्हाला सर्वसामान्यांच्या प्रश्नांना वाचा फोडायची आहे, असे मनसेने या प्रकरणी सांगितले आहे.

मनसेचे नवनिर्वाचित मुंबई अध्यक्ष संदीप देशपांडे यांनी याविषयी बोलताना सांगितले की, राज्यात काही ठिकाणी ३, तर काही ठिकाणी ५ वर्षांपासून महापालिका अस्तित्वात नाही. महापालिका प्रशासन व लोकप्रतिनिधी या दोन चाकांवर चालते. यातील एक चाक पूर्णतः पंक्चर झाले आहे. या चाकाची अक्षरशः वाट लागली आहे. गाडी केवळ एका चाकावर चालू आहे. त्यामुळे ती केव्हाही उलटण्याची भीती आहे. ही गाडी रुळावर आणण्यासाठी आम्ही प्रति महापालिका ही संकल्पना सुरू करत आहोत, असे संदीप देशपांडे यांनी सांगितले.

# अबीर गुलाल चित्रपट प्रदर्शित होऊ देणार नाही; मनसेचा इशारा




■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २ :**
'अबीर गुलाल' या चित्रपटाचा टीझर मंगळवारी प्रदर्शित झाला. यात पाकिस्तानी कलाकार फवाद खान पुन्हा एकदा चाहत्यांचे मनोरंजन करण्यासाठी सज्ज झाला आहे. मात्र, त्याचे हे पुनरागमन अनेक अडचणीशिवाय राहणार नाही, असेच चित्र आता दिसून येत आहे.

टीझर प्रदर्शित झाल्यानंतर काही तासांतच राज ठाकरे यांच्या महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने (मनसे) महाराष्ट्रात चित्रपटाच्या प्रदर्शनाला विरोध केल्याने चित्रपट अडचणीत सापडला आहे. मनसेचे नेते अमेय खोपकर यांनी या संदर्भात एका पोस्टच्या माध्यमातून हा चित्रपट प्रदर्शीत होऊ देणार नसल्याचे म्हटले आहे.

निर्मात्यांनी या चित्रपटाच्या प्रदर्शनाची घोषणा केली तेव्हाच आम्हाला या चित्रपटाच्या प्रदर्शनाची माहिती मिळाली. परंतु आम्ही हे स्पष्ट करत आहोत की आम्ही हा चित्रपट महाराष्ट्रात प्रदर्शित होऊ देणार नाही कारण त्यात पाकिस्तानी कलाकार आहे. कोणत्याही परिस्थितीत आम्ही अशा चित्रपटांना राज्यात प्रदर्शित होऊ देणार नाही. आम्ही चित्रपटाबद्दल अधिक माहिती जमा करत आहोत आणि लवकरच संपूर्ण निवेदन जारी करू, असे अमेय खोपकर यांनी म्हटले आहे.

या वादावर प्रतिक्रिया देताना शिवसेना नेते संजय निरुपम म्हणाले की, भारतात पाकिस्तानबद्दल व्यापक द्वेष आहे. जेव्हा पाकिस्तानचा चित्रपट प्रदर्शित होतो तेव्हा भारतीय प्रेक्षक तो पाहणे पसंत करत नाहीत. जरी काही लोक उत्सुकतेने तो पाहत असले तरी, पाकिस्तानी कलाकारांना भारतात कधीही व्यापक यश मिळू शकलेले नाही. जर केंद्र सरकारचे याबाबत धोरण असेल तर ते अंमलात आणले पाहिजे. पाकिस्तानी चित्रपट भारतात प्रदर्शित करावेत किंवा त्यांच्या कलाकारांना येथे काम करण्याची परवानगी द्यायचा निर्णय सरकारने घ्यावा.

या संदर्भात अमेय खोपकर यांनी एक पोस्ट केली आहे. यामध्ये त्यांनी म्हटले की, पाकिस्तानी कलाकारांचे चित्रपट भारतात प्रदर्शित होऊ देणार नाही, हे इतक्या वेळा सांगूनही काही नासके आंबे उपटतातच. मग त्यांना कचऱ्यात टाकायचं काम मन-सैनिकांनाच करावं लागणार आणि आम्ही ते करणार, करत राहणार...

अबीर गुलाल हा चित्रपट भारतात प्रदर्शित होऊ देणार नाही म्हणजे नाही. ज्यांना पाकिस्तानी कलाकारांना डोक्यावर घ्यायचंय त्यांनी खुशाल घ्या, पण लक्षात ठेवा सामना आमच्याशी आहे, असा इशारा मनसेने दिला आहे.

# औरंगजेबाला इथेच गाडला....

## मनसेची पोस्टरबाजी




■ **वृत्तसंस्था, छ. संभाजीनगर, दि. २ :**
सध्या संपूर्ण देशात औरंगजेबाच्या कबरीवरुन सुरु असलेला वाद संपायचे नाव घेत नाही. एकीकडे काही लोक कबर हटवण्याची मागणी करत आहेत. दुसरीकडे, अनेक नेत्यांनी आणि अगदी संघानेही याला वायफळ मुद्दा असे म्हटले आहे. या सगळ्यात महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने छत्रपती संभाजीनगरमध्ये ठिकठिकाणी पोस्टर्स लावले आहेत. या पोस्टरवर औरंगजेब इथेच गाडलाझ्ट असे लिहिण्यात आले आहे. या पोस्टरची सध्या सगळीकडे चर्चा सुरु आहे.

मनसेने लावलेल्या पोस्टरमध्ये औरंगजेबाची कबर आणि तिथे जाण्याच्या मार्गाची माहिती देण्यात आली आहे. या पोस्टर्सनंतर राज्यात पुन्हा एकदा औरंगजेबबाबत चर्चा सुरू झाली आहे.

संभाजीनगरच्या खुलताबाद येथे औरंगजेबाची कबर आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी पाडवा मेळाव्यात सांगितले की, आम्हा मराठ्यांना उद्धवस्त करण्यासाठी आलेल्या औरंगजेबला येथे गाडण्यात आले. हा इतिहास प्रत्येकाला कळला पाहिजे, आपल्या पुढच्या पिढीतील प्रत्येक तरुणाला, प्रत्येक शाळकरी मुलाला हे माहित असले पाहिजे.

राज ठाकरे यांच्या भाषणानंतर मनसेने छत्रपती संभाजीनगर शहरात औरंगजेबाची कबर किती किलोमीटर अंतरावर आहे याबाबतचे बॅनर लावले आहे. क्रांती चौकापासून २७ किमी, जिल्हा न्यायालयापासून २६ किमी, बाबा पेट्रोल पंप २५ किमी, होली क्रॉस शाळा २४ किमी, नगर नाका २३ किमी, पडेगाव २१ किमी, शरणपूर १४ किमी. आपल्यावर हल्ला करणारा शत्रू कुठे गाडला आहे हे सर्वांना कळावे म्हणून असे किलोमीटरचे बॅनर मनसेने लावले आहेत. एका बॅनरवर ह्यआपल्या मराठ्यांना संपवायला आलेला औरंगजेब इथेच गाडला गेला- राज ठाकरे कबर.. खुलताबाद २७ किलोमीटर असे लिहिण्यात आले आहे.

एक दिवसापूर्वी मनसेने कबरीच्या देखभालीवर सरकारी पैसा खर्च करू नये, अशी मागणी केली होती. आता मनसेच्यावतिने हे अभिवन पद्धतीचे बॅनर लावण्यात आले आहे.

# सासूचा खून करून सून बुलेटवर पसार







■ **वृत्तसंस्था, जालना, दि. २ :**
सासूची हत्या करून सूनेने तिच्या मृतदेहाची पोत्यात भरून विल्हेवाट लावण्याचा प्रयत्न केल्याची भयंकर घटना जालना शहरातील भोकरदन नाका परिसरातील प्रियदर्शनी कॉलनी येथे घडली आहे. घरमालकाच्या सतर्कतेमुळे हा प्रकार उजेडात आला. त्यानंतर आरोपी सून एका अज्ञात व्यक्तीच्या बुलेटवर बसून घटनास्थळावरून पसार झाली.

सविता संजय शिनगारे (४५) असे मृत सासूचे नाव आहे. तर प्रतिक्षा शिनगारे असे आरोपी सूनेचे नाव आहे. सविता यांचा मुलगा लातूर येथे नोकरीनिमित्त राहतो. त्यामुळे सासू व सून या दोघी शहरातील प्रियदर्शनी कॉलनी येथे एका किरायाच्या घरात घरात राहत होत्या. या दोघींमध्ये कोणत्याही तरी गोष्टीमुळे वाद झाला होता. या कौटुंबिक वादातून सूनेने बुधवारी पहाटे सासूचे डोके जोरात भिंतीवर आदळले. त्यात सासू सविता यांचा जागीच मृत्यू झाला.

यानंतर प्रतिक्षा शिनगारेने मृतदेहाची विल्हेवाट लावण्यासाठी तो एका पोत्यात भरला. त्यानंतर ते पोते घराबाहेर आणले. पहाटे हा प्रकार सुरू होता. घराबाहेर सुरू असणारी ही हालचाल घरमालकाच्या निदर्शनास आली. त्यानंतर त्यांनी लागलीच त्याची माहिती पोलिसांना दिली. घरमालकाची ही सतर्कता पाहताच आरोपी सून सासूचा मृतदेह तसाच सोडून घटनास्थळावरून पसार झाली. स्थानिकांच्या माहितीनुसार, आरोपी सून एका अज्ञात व्यक्तीच्या बुलेटवर बसून पसार झाली. त्यानुसार पोलिस सून व बुलेटस्वाराचा शोध घेत आहेत.

या घटनेची माहिती मिळताच अप्पर पोलिस अधीक्षक आयुष नोपाणी, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक पंकज जाधव, सदरबाजार पोलिस ठाण्याचे निरीक्षक संदीप भारती यांनी घटनास्थळी धाव घेऊन स्थितीचा आढावा घेतला. ही सर्व घटना सीसीटीव्हीमध्ये कैद झाली आहे. पोलिसांनी हे फुटेज आपल्या ताब्यात घेतले आहे. आरोपीच्या शोधार्थ एलसीबी व सदरबाजार पोलिस ठाण्याची पथके रवाना झाली आहेत.

**६ महिन्यांपूर्वीच झाला होता विवाह**

उल्लेखनीय बाब म्हणजे शिनगारे कुटुंब हे मूळचे बीड जिल्ह्यातील गेवराई तालुक्यातील वावरे अंतरवाली येथील आहे. सविता यांचा मुलगा आकाश संजय शिनगारे यांचा ६ महिन्यांपूर्वीच परभणी येथील प्रतीक्षा हिच्यासोबत झाला होता. आकाश हा लातूर येथे खासगी नोकरीस आहे. त्यामुळे सविता व प्रतीक्षा या दोघीच जालन्यात किरायाच्या घरात राहत होत्या.

# जिल्ह्यातील ग्रामिण भागात दोन हत्यांचा थरार

## वरुडात वडिलांने मद्यपी मुलाची केली हत्या | तळेगावात मुलाने आईलाच संपविले



**महासागर प्रतिनिधी**

*अमरावती, ( दि. 2 ) - जिल्ह्यातील वरुड तालुक्यात आणि तळेगाव दशासर हद्दीत हत्येच्या घटनांचा थरार 1 एप्रिल रोजी सायंकाळनंतर पुढे आला. वरुड पोलिस ठाण्याच्या हद्दीतील गणेश पुर गावात वडिलांनी मद्यपी मुलाची कुऱ्हाडीने हल्ला करून हत्या केली, तर तळेगाव दशासर हद्दीत एका विधी संघर्षीत बालकाने आपल्या आईचा जीव घेतला. या दोन्ही घटनांमध्ये ग्रामिण भागात प्रचंड खळबळ उडाली आहे.*

### मुलानेच केली आईची कुऱ्हाडीने हत्या

तळेगाव पोलीस स्टेशन हद्दीतील एका गावात 31 मार्च रोजी सायंकाळी एका अल्पवयीन मुलाने आपल्या सख्ख्या आईलाच संपविल्याची घटना पुढे आली. आईने सिगारेट ओढण्यास आणि दारू पिण्यास पैसे न दिल्याने मुलाने हे कृत्य केल्याची माहिती पोलिस तपासात पुढे आली आहे. मुलाने आईच्या डोक्यावर कुऱ्हाडीने वार करून तिला गंभीर जखमी केले होते. त्यामुळे आईला यवतमाळ रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. परंतू आईचा मृत्यू झाला. याप्रकरणात पोलिसांनी अल्पवयीन मुलाला ताब्यात घेतले असून, त्याच्याविरुध्द गुन्हा नोंदविला आहे.

### समाजमन हळहळले, घटनेचा तिव्र संताप


या दुर्दैवी घटनेमुळे स्थानिक नागरिकांमध्ये संतापाची भावना निर्माण झाली आहे. व्यसनामुळे कुटुंबातील नाती कशी बिघडू शकतात, याचे हे एक गंभीर उदाहरण आहे. गावातील ज्येष्ठ नागरिकांनी अशा घटनांना आळा घालण्यासाठी पालकांनी आपल्या मुलांच्या सवयींकडे विशेष लक्ष द्यावे, असे आवाहन करण्यात आले आहे. तसेच, व्यसनाधीन व्यक्तींना वेळेवर समुपदेशन मिळावे आणि त्यांचे पुनर्वसन व्हावे, अशी मागणीही पुढे येत आहे. पालकांनी आपल्या मुलांच्या संगतीकडे आणि त्यांच्या सवयींकडे विशेष लक्ष द्यावे, अशी सुचना तज्ज्ञांनी दिली आहे. गावकऱ्यांनीही व्यसनमुक्तीबाबत अधिक जनजागृती करण्याची गरज असल्याचे सांगितले आहे. पोलिस प्रशासनानेही या प्रकरणाचा सखोल तपास करून आरोपीवर योग्य ती कारवाई केली जाईल, असे स्पष्ट केले आहे.

### मद्यपी व्यसनाधिन मुलाच्या डोक्यावर मारली कुऱ्हाडी

वरुड तालुक्यातील जामठी स्थित गणेशपूर येथील रहिवासी सुरेश छोटेलाल बुवाडे (40) आणि त्याचे वडील छोटेलाल भावजी बुवाडे (67) यांच्यात दररोज वाद होत होते. सुरेश हा वडिलांना मारण्याची धावून जात होता. त्यामुळे वडिल छोटेलाल यांचा राग अनावर होत होता. अशातच 1 एप्रिल रोजी सकाळी सुरेश हा गाढ झोपेत असताना, वडील छोटेलालने मुलगा सुरेशवर कुऱ्हाडीने हल्ला केला. त्यांनी मुलाच्या डोक्यावर दोन-तीन वार करून, त्याला जागीच ठार केले. या घटनेच्या माहितीवरून वरुड पोलिसांचे पथक घटनास्थळी पोहोचले. त्यानंतर पोलिसांनी काही वेळातच आरोपी वडिल छोटेलाल भावजी बुवाडेला अटक केली. याप्रकरणात नानीबाई छोटेलाल बुवाडे यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

# मंत्री बावनकुळेंच्या नावाने जिल्हाधिकाऱ्यांना पाठविले बनावट पत्र

## शहर पोलिसांनी केला गुन्हा दाखल



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.2 )** - महाराष्ट्र राज्याचे महसूल मंत्री तथा अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या नावाने एका अज्ञात व्यक्तीने जिल्हाधिकाऱ्यांना बनावट लेटरहेडवर बनावट स्वाक्षरी करून एका वरिष्ठ लिपिकावर कार्यवाही करण्याचं पत्र दिल्याचे उघडीस आले आहे.

घटनेची गंभीरता पाहता पोलीस आयुक्त नविनचंद्र रेड्डी यांनी संबंधित अज्ञात व्यक्तीवर गुन्हे दाखल आदेश दिले आहे. अज्ञात व्यक्तीने महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या नावाने जिल्हाधिकारी अमरावती यांना पत्र पाठवले, या मध्ये मोर्शी येथील एका वरिष्ठ लिपिकावर कारवाई करण्यासंदर्भात हे पत्र आहे, हे पत्र बनावट स्वाक्षरी सह लेटर हेड वर दिले. पोस्ट व्दारे हे बनावट पत्र पाठवण्यात आले होते. मात्र जिल्हाधिकारी यांनी हे लेटर तपासले असल्यास त्यांना लेटरहेड सह पालकमंत्री व महसूल मंत्र्यांची सही ही बनावट असल्याचे उघडीस आले, हा प्रकार लक्षात येताच पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे विशेष कार्यकारी अधिकारी योगेश कोठेकर यांनी तत्काळ पोलिस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी यांच्याशी सविस्तर चर्चा करीत लेटरहेड व सही बनावट असल्याच स्पष्ट केले. संबंधित अज्ञात व्यक्तीचा शोध घेऊन तत्काळ गुन्हे दाखल करण्याचे आदेश यावेळी पोलिस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी यांनी दिले.

### पत्रात वरुड च्या लिपीकावर कारवाईची तक्रार

हे बनावट पत्र गेल्या 19 मार्च रोजी जिल्हाधिकारी कार्यालयाला प्राप्त झाले होते. त्यात वरूड नगर पालिकेतील एका लिपिकावर कारवाई करण्याचे सांगण्यात आले आहे. या लिपिकाने वरिष्ठांच्या वरदहस्ताने परस्पर जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नगर पालिका विभागात डेप्युटेशनने नेमणूक मिळवली. पण, हा लिपिक तेथेही गायब असल्याची तक्रार आहे. हा लिपिक नागरिकांचे फोन उचलत नाही, दादागिरीची भाषा वापरतो, अशा अनेकांच्या तक्रारी आहेत. या लिपिकाची नेमणूक जिल्हाधिकाऱ्यांनी रद्द करावी आणि त्याची हकालपट्टी करावी, असे या पत्रात नमूद करण्यात आले होते. नगर पालिकेतील निम्मे कर्मचारी हे गायब असल्याचे त्यात नमूद आहे. नगर पालिका विभाग हा बोगस कर्मचाऱ्यांचा अड्डा झाला आहे, असाही उल्लेख या पत्रात आहे. पोस्टाद्वारे हे पत्र पाठविण्यात आले होते. हे पत्र बनावट असल्याचे उघड झाले. गाडगेनगर पोलिसांनी या प्रकरणी गुन्हा दाखल केला आहे.

# जबरी चोरीतील चार आरोपींना अटक, एक अल्पवयीनही ताब्यात

## अमरावती शहर गुन्हे शाखा युनिट 2 ची कारवाई



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 2 )** - फ्रेजरपुरा येथील जबरी चोरी प्रकरणात शहर गुन्हे शाखा युनिट 2 च्या पथकाने चार आरोपींना अटक केली असून, एक विधी संघर्षीत बालकही ताब्यात घेतले आहे. हेमंत ओमकार पेठकर (19, रा. बुधवारा, निळकंठ चौक, अमरावती), रोहीत विनोद शेरेकर (20, रा. बुधवारा माता खिडकी, अमरावती), रोहन वासुदेवराव नाईक (24, रा. खडकाडीपुरा, अमरावती) व कृष्णा मंगेश कलाने (19, रा. औरगंपुरा, अमरावती) अशी अटकेतील आरोपींची नावे आहेत. पोलिस सुत्रानुसार, 28 मार्च रोजी वेदांत गिरीश मानमोडे (19, रा. बुधवारा अंबागेट) हा त्याचा मित्र संस्कार साहु यांच्यासह मोपेड वाहनाने डॉ. राजेंद्र गोडे महाविद्यालयाजवळुन जात होते. दरम्यान त्यांच्या मागुन चार दुचाकीवर पाच ते सहा जण आले आणि त्यापैकी दोन इसमांनी वेदांत यांच्या मोपेड वाहनाला धडक दिली. त्यामुळे वेदांत व त्याचा मित्र खाली पडले. त्यावेळी पाच ते सहा जणांनी वेदांत व संस्कारला घेराव करून चाकु काढला आणि त्यांनी संस्कारवर चाकुने दोन वेळा वार केले. त्यानंतर त्यांनी संस्कारजवळील 2 लाख 60 हजार रुपये किमंतीचा कॅमेरा जबरीने हिसकावून घेतला. त्यानंतर आरोपी अमरावतीचे दिशेने दुचाकीवरून पसार झाले. या घटनेच्या तक्रारीवरून फ्रेजरपुरा पोलिस ठाण्यात आरोपींविरुध्द गुन्हा नोंदविण्यात आला. सदर गुन्हा उघडकिस आणण्यासाठी पोलीस आयुक्त नविनचंद्र रेड्डी यांनी गुन्हे शाखेला आदेशीत केले होते. त्यानुसार सदर गुन्ह्याचा संमातर तपास करीत असतांना पोलिस पथकाने विविध ठिकाणचे सि.सि.टी.व्ही. फुटेज पाहीले. तसेच तांत्रीक विश्लेषन करून गुप्त माहिती काढली. त्यानंतर चार आरोपी व एका एका विधी संघर्षीत बालकाला पोलिसांनी ताब्यात घेतले. पोलिसांनी आरोपींची चौकशी केल्यानंतर, त्यांनी गुन्हा केल्याची कबुली दिली.

### फरार तीन आरोपींचा शोध सुरु

आरोपींनी या गुन्ह्यात वापरलेली एक वाहन जप्त करण्यात आले आहे. या गुन्ह्यातील अन्य मुद्देमाल तसेच शस्त्राबाबत पोलिसांना माहीती मिळाली आहे. त्यानुसार पुढील कार्यवाहीकरीता फ्रेजरपुरा पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे. या गुन्ह्यातील इतर तीन फरार आरोपींच्या शोधाकरिता पोलिस पथक रवाना करण्यात आले आहे. सदरची कारवाई पोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी, पोलीस उपायुक्त गणेश शिंदे, कल्पना बारावकर, सागर पाटील, सहायक पोलीस आयुक्त शिवाजी बचाटे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक बाबाराव अवचार यांच्या नेतृत्वाखाली सहायक पोलिस निरीक्षक महेश इंगाले, पोलिस उपनिरीक्षक संजय वानखडे, पोलीस अंमलदार दिपक सुंदरकर, गजानन ढेवले, आस्तीक देशमुख, मनोज ठोसर, मंगेश शिंदे, संग्राम भोजने, वेतन कराडे, राजीक रायलीवाले, सागर ठाकरे, योगेश पवार, संदीप खंडारे, चेतन शर्मा, राहुल दुधे यांनी केली आहे.

## अल्पवयीन मुलगी गर्भवती

**अमरावती** - आरोपी तरुणाने वरुड पोलिस ठाण्याच्या हद्दीत राहणाऱ्या 17 वर्षीय अल्पवयीन मुलीशी लग्न केले. त्यानंतर त्याने तिच्याशी जबरदस्तीने शारीरिक संबंध ठेवले. त्यामुळे अल्पवयीन मुलगी गरोदर राहिली. अल्पवयीन मुलीच्या तक्रारीवरून वरुड पोलिसांनी तिच्या पतीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, वरुड पोलिस ठाण्याच्या हद्दीतील एका गावातील 30 वर्षीय आरोपी तरुणाने मुलगी अल्पवयीन असल्याचे माहीत असतानाही तिच्याशी लग्न केले. त्यानंतर अल्पवयीन मुलीसोबत जबरदस्तीने शारीरिक संबंध ठेवले. 28 मे 2024 रोजी नागपुरातील नरखेड येथील एका मंदिर परिसरात नेऊन दोन महिने जबरदस्तीने अत्याचार केला. त्यामुळे 1 जून 2024 रोजी अल्पवयीन मुलगी गरोदर राहिली. रूग्णालयातील तपासणी अहवालात ही बाब समोर आल्यावर, अल्पवयीन मुलीच्या तक्रारीवरून वरुड पोलिसांनी तिच्या पतीविरुद्ध पोक्सो अंतर्गत अत्याचाराचा गुन्हा दाखल करून तपास सुरू केला.

## वस्तरा मारून व्हीडीओ गेमच्या मशिनची तोडफोड

**अमरावती** - दारू पिऊन असलेल्या तरुणांना हटकणार्या व्हीडीओ पार्लर व्यवसायीकावर वस्तर्याने वार करून, त्यांच्या दुकानातील दोन मशिनची तोडफोड करण्यात आली. कलिम शहा गोंडू शहा (48, रा. नया दायरा, वरुड) यांनी या घटनेची तक्रार 31 मार्च रोजी वरुड पोलिस ठाण्यात दिली. त्यानुसार पोलिसांनी आरोपी सैय्यद साकीद (35, रा. घाटोळे प्लॉट, वरुड) व एका अज्ञात आरोपीविरुध्द गुन्हा नोंदविला आहे. पुढिल तपास वरूड पोलिस करीत आहे.

# दुचाकीच्या भीषण अपघातात दोघांचा मृत्यू

## अंबापाटी-गिरगुटी रस्त्यावर अपघात

**अमरावती** - चिखलदरा पोलिस ठाणे हद्दीतील अंबापाटी-गिरगुटी रस्त्यावर झालेल्या भीषण दुचाकी अपघातात दोन तरुणांचा घटनास्थळीच मृत्यू झाला. परशुराम बाबुलाल बेलसरे आणि प्रदीप शंकर जामुनकर या दुचाकीचालकांचा मृतांमध्ये समावेश आहे. प्राप्त माहितीनुसार, परशुराम आणि प्रदीप हे दोघे एमएच 27/डीक्यू 4323 क्रमांकाच्या दुचाकीने गिरगुटीहून अंबापाटीकडे जात असताना वाटेत दुचाकीवरील नियंत्रण सुटल्याने वाहनाचे नियंत्रण सुटले. त्यामुळे पंपा नाल्याजवळ दुचाकीचा अपघात झाला. या अपघातात दुचाकीवरील परशुराम व प्रदीप यांचा जागीच मृत्यू झाला. घटनेनंतर दोन्ही दुचाकीस्वारांना तात्काळ टेंबुसोंडा येथील प्राथमिक उपचार केंद्रात दाखल करण्यात आले. जिथे डॉक्टरांनी दोघांना मृत घोषित केले. या भीषण अपघातामुळे पीडित कुटुंबियांवर शोककळा पसरली आहे. स्थानिक प्रशासन आणि पोलिसांनी या घटनेचा तपास सुरू केला आहे. अपघाताचे कारण आणि संभाव्य निष्काळजीपणा शोधण्यासाठी अधिक तपास करण्याचे आश्वासन पोलिसांनी दिले आहे.

# अनामत रक्कम परत न केल्याने दोन लाख रुपयांचा माल केला लंपास

## गाडगेनगर पोलिस ठाण्याच्या हद्दीतील घटना


**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 2 )** - 11 महिन्यांसाठी भाड्याने हॉटेल घेतले आणि 50 हजार रुपये डिपॉझिट दिले. मात्र दुसऱ्या महिन्यात हॉटेल बंद करून 50 हजार रुपये अनामत रक्कम परत मागितली. अनामत रक्कम परत न केल्याने एका तरुणाने हॉटेलमधून दोन लाख रुपयांचा माल चोरल्याची घटना 30 मार्च रोजी रात्री घडली.

महिलेच्या तक्रारीवरून गाडगेनगर पोलिसांनी चैतन्य राजेंद्र कचरे (28, महेंद्र कॉलनी, खैरैय्या नगर) आणि त्याच्या साथीदाराविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. तक्रारदार महिलेचे गाडगेनगर पोलिस ठाण्याच्या हद्दीत हॉटेल आहे. महिलेने हे हॉटेल आरोपी चैतन्य कचरे याला 11 महिन्यांसाठी भाड्याने दिले होते. चैतन्यने महिलेला ठेव म्हणून 50 हजार रुपये दिले होते. करारानुसार, मी हॉटेल रिकामे केल्यावर ही ठेव परत करण्याचा निर्णय घेण्यात आला. मात्र चैतन्यने दुसऱ्या महिन्यातच हॉटेल बंद करून महिलेला 50 हजारांची अनामत रक्कम परत करण्यास सांगितले. त्यानंतर महिलेने चैतन्यला काही अवधी मागितला. मात्र 30 मार्च रोजी रात्री आरोपी चैतन्य व त्याच्या साथीदारांनी हॉटेलच्या गेटचे कुलूप तोडून हॉटेलमधील ड्रिप फ्रीझर, वॉटर कुलर, एक लोखंडी टेबल, 10 गॅस सिगार व सिलेंडर, 10 टेबल व भांडी असा एकूण 2 लाख रुपयांचा ऐवज चोरून नेला. महिलेने फोन करून चैतन्यकडे सामानाबाबत विचारणा केली असता, त्याने स्वत: सामान घेऊन गेलो असल्याचे सांगितले. महिलेच्या तक्रारीवरून गाडगेनगर पोलिसांनी चैतन कचरे आणि त्याच्या साथीदाराविरुद्ध गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

# अमरावती जिल्ह्यात हलका पाऊस

## तापमान 7 अंशाने घसरले | ढगाळ वातावरणाने नागरिकांना उन्हापासून दिलासा



**महासागर प्रतिनधी**

**अमरावती** - एप्रिलच्या कडक उन्हाच्या पहिल्याच दिवशी पावसाळी ढगाळी वातावरण निर्मीत झाले होते, तर मंगळवारी सायंकाळनंतर अचानक अवकाळी हलक्या पावसाने अनेक ठिकाणी हजेरी लावली. त्यामुळे जिल्ह्याच्या सरासरी कमाल तापमानात 7.2 डीग्री सेल्सिअसने घसरले. तापमान घसरल्याने नागरिकांना उन्हाच्या तिव्रतेपासून मोठा दिलासा मिळाला. बुधवारीही ढगाळ वातावरण कायम होते. त्यामुळे जिल्ह्यातील कमाल तापमान 34.8 तर किमान तापमान 19.3 डीग्री सेल्सीअसपर्यंत उतरले होते. परंतू आता पुढे तापमान वाढीचे संकट उभे ठाकले आहेच.

नागपूर येथील प्रादेशिक हवामान केंद्राच्या अहवालानुसार, मंगळवारी जिल्ह्याचे सरासरी कमाल तापमान 33.6 डीग्री सेल्सीअस नोंदविले गेले. तर सरासरी किमान तापमान 27.3 डीग्री सेल्सीअसर नोंदविले गेले आहे. त्यामुळे नागरिकांना उष्णतेपासून बराच दिलासा मिळाला. मंगळवारी सूर्यदर्शनही खूप उशिरा झाले. दिवसभर आकाश ढगाळ राहिले. 2 एप्रिल रोजीही जिल्ह्यात असेच तापमान होते

### वादळी पावसासह गारपिटीचीही शक्यता

श्री शिवाजी कृषी महाविद्यालयातील हवामान तज्ज्ञ अनिल बंड यांच्या अंदाजानुसार, 3 मार्च रोजी विदर्भातील सर्व जिल्ह्यात काही ठिकाणी विखुरलेल्या स्वरूपात हलक्या मध्यम पाऊस, वीजांचा गडगडाट आणि वादळी वार्यासह पावसाची शक्यता आहे. अमरावती, अकोला, चंद्रपूर, यवतमाळ, नागपूर, वर्धा या जिल्ह्यातील तुरळक ठिकाणी गारपीट होण्याची चेतावणी हवामान खात्याने व्यक्त केली आहे. 4 व 5 एप्रील रोजी विदर्भात तुरळक ठिकाणी हलक्या पावसाची शक्यता आहे. तसेच पुढील दोन ते तीन दिवस तापमान कमी राहील. त्यानंतर कमाल तापमान हळूहळू वाढत जाईल आणि त्यानंतर 8 व 9 एप्रील दरम्यान पुन्हा हलक्या पावसाची शक्यता आहे.

### 2.6 मिमी. पावसाची नोंद

2 एप्रिल सकाळी 11.30 वाजेपर्यंत अमरावती जिल्ह्यातील 14 तालुक्यात सरासरी 2.6 मी.मी. पावसाची नोंद झाली आहे. यामध्ये धारणीत 0.3 मी.मी., चिखलदरा 1.0 मी.मी., अमरावती 2.4 मी.मी., भातकुली 0.8 मी.मी., नांदगाव खंडेश्वर 0.6 मी.मी., चांदुररेल्वे 3.5 मी.मी.,तिवसा 5.6 मी.मी., मोर्शी 1.4 मी.मी., वरुड 2.6 मी.मी., दर्यापूर 1.1 मी.मी., अंजनगाव सुर्जी 1.6 मी.मी., अचलपूर 3.7 मी.मी., चांदुरबाजार 1.0 मी.मी., धामणगाव 1.5 मी.मी. अशा पावसाची नोंद झाली आहे.


**कृषि उत्पन्न बाजार समिती, अमरावती**

**विलास नगर रोड, अमरावती, 444604**

**दूरध्वनी क्रमांक ( कार्यालय ) ( 0721 ) 2572024 / 2572178**

**बाजार समितीच्या प्रिटिंग ठेक्याबाबत जाहिर निविदा**

बाजार समितीस सन 2025-26 करीता कार्यालयीन साहित्य छपाई करण्याकरीता नोंदणीकृत निविदाधारकांकडुन खालील अटी व शर्तीस अधीन राहून ई-निविदा मागविण्यात येत आहे.

1) निविदा फार्म किंमत 2000/- (दोन हजार रुपये)
2) अनामत रक्कम 15,000/- (पंधरा हजार रुपये)
3) निविदाचे अटी शर्ती कार्यालयात कार्यालयीन वेळेत उपलब्ध आहे. प्रिटिंग साहित्याचे नमुने बाजार समितीचे कार्यालयात कार्यालयीन वेळेत पाहावयास मिळतील
4) निविदा घेण्याकरीता दि.04/04/2025 पासुन दि.12/04/2025 रोजी पर्यंत उपलब्ध राहिल.
5) निविदा दाखल करण्याची अंतिम मुदत दि.12/04/2025 रोजी सांयकाळी 4 वाजेपर्यंत उपलब्ध राहील.
6) निविदा दि.15/04/2025 रोजी उघडण्याची येईल तसेच शक्य नसल्यास समिती मार्फत आपणास कळविण्यात येईल.
7) महत्वाची सुचना निवेदेमध्ये दर भरतांना काळजीपूर्वक दर भरावेत.
8) निविदेत दर भरतांना ते सर्व टॅक्ससहीत (सी.जी.एस.टी व एस.जी.एस.टी इतर चार्जेस) अंतर्भूत करुनच भरावेत टॅक्सविरहीत भरण्यात आलेले दर ग्राह्य धरले जाणार नाही.
9) निविदा स्विकारण्याचे अथवा कोणतेही कारण न देता नाकारण्याचे अधिकार मा. सभापती यांचे कडे राखुन ठेवलेले आहे.

**( हरिष मोरे )** - **सभापती**

**( दिपक विजयकर )** - **सचिव**

**कृषि उत्पन्न बाजार समिती, अमरावती**



आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# बिहारमध्ये एनडीएचे कप्तान नितीश कुमारच!

इंडिया कॉलिंग
डॉ. सुकृत खांडेकर
sukritforyou@gmail.com

बिहार विधानसभेच्या निवडणुकीला अजून सहा-सात महिने बाकी आहेत, पण आतापासूनच भाजपा आणि जनता दल (युनायटेड)प्रणीत एनडीए विरुद्ध राष्ट्रीय जनता दल, काँग्रेस पक्षांनी दंड थोपटायला सुरुवात केली आहे.

येत्या विधानसभा निवडणुकीत भाजपा आणि नितीश कुमार यांची जनता दल (यु) यांची युती टिकेल का, इथपासून पुन्हा एनडीएला सत्ता मिळाली तर बिहारचे मुख्यमंत्रीपद भाजपा नितीश कुमार यांना देईल का, अशा चर्चांना उधाण आले आहे.

सध्याच्या वातावरणात आणि निवडणूक लढविण्यासाठी भाजपाला नितीश कुमार यांची गरज आहे आणि नितीश कुमार यांनाही भाजपा आपल्याला पुन्हा मुख्यमंत्रीपदावर बसवेल अशी आशा वाटत आहे. भाजपाने पुन्हा एकदा लालूप्रसाद यादव यांच्यावर जंगल राज, गुंडा राज असे जोरदार हल्ले चढवायला सुरुवात केली आहे.

जनता दल युनायटेडचे सर्वेसर्वा नितीश कुमार हे राज्याचे गेली वीस वर्षे मुख्यमंत्री असून भाजपा व लोक जनशक्ती पार्टी त्यांचे समर्थन करीत आहे. निवडणुकीच्या अगोदर शतप्रतिशत भाषा बोलणाऱ्या भाजपाला बिहारच्या राजकारणात पुन्हा नितीश कुमार यांचाच चेहरा पुढे करावा लागत आहे.

सन २०२० मध्ये राज्यात झालेल्या विधानसभा निवडणुकीत खरे तर भाजपाने बाजी मारली होती. २४३ जागांच्या विधानसभेत भाजपाने ११० जागा लढवल्या आणि ७४ आमदार निवडून आले. जनता दल (यु) पक्षाने ११५ जागा लढवल्या व या पक्षाचे केवळ ४३ आमदार निवडून आले.

महाराष्ट्राप्रमाणे तेव्हासुद्धा भाजपाला पाटण्याच्या सिंहासनावर मुख्यमंत्रीपदावर दावा ठोकता आला असता, पण भाजपाने उदारमनाने कमी आमदार असलेल्या मित्रपक्षाचे नेते नितीश कुमार यांना मुख्यमंत्रीपद दिले. या घटनेला आता पाच वर्षे उलटली आहेत.

येत्या विधानसभा निवडणुकीत भाजपाचे सर्वाधिक आमदार विजयी झाले, तर पुन्हा एकदा मुख्यमंत्रीपद नितीश कुमार यांच्या झोळीत टाकेल का? विधानसभा निवडणुकीनंतर नितीश कुमार यांना महाराष्ट्राप्रमाणे एकनाथ शिंदे यांच्यासारखी भूमिका बजावावी लागेल का, असे तर्क आतापासूनच लढवले जात आहेत.

गेल्या वेळेप्रमाणेच बिहारच्या निवडणुकीत एकमेकांचे राजकीय शत्रू तेच आहेत. एका बाजूला भाजपा, जनता दल यु, चिराग पासवान यांचा लोक जनशक्ती आणि जीतन राम मांझी यांचा हम आणि समोर राष्ट्रीय जनता दल, काँग्रेस आणि महाआघाडीतील छोटे पक्ष असणार आहेत.

जातीपातीची व्होट बँक आणि जागा वाटप हा दोन्ही बाजूला कळीचा मुद्दा आहे. राजद आणि काँग्रेस यांच्यात जागा वाटपाची खेचाखेची ही मोठी कसोटी आहे. २०२०ची विधानसभा आणि २०२४ ची लोकसभा, या दोन्ही निवडणुकांत बिहारमधील मतदारांनी भाजपा-जनता दल (यु) ला मोठे झुकते माप दिले. लोकसभा निवडणुकीत, तर ४० पैकी तीसपेक्षा जास्त जागांवर एनडीएचे खासदार निवडून आले. नंतर झालेल्या पोटनिवडणुकांतही महाआघाडीतील मतभेद आणि खदखद बघायला मिळाली.

राजीव रंजन ऊर्फ पप्पू यादव यांना पूर्णिमा मतदारसंघाची जागा सोडायला लालू यादव यांनी साफ नकार दिला. पण प्रतिकूल वातावरण असतानाही पप्पू यादव या मतदारसंघातून निवडून आले व त्यांनी लालूंनाच धडा शिकवला. काँग्रेस व राजदमध्ये दिल्लीतील जवाहरलाल नेहरू विद्यापीठातील (जेएनयु) विद्यार्थी संघटनेचे माजी अध्यक्ष कन्हैया कुमार यांच्यावरून वादंग चालूच आहे.

ते भाजपा विरोधी आहेत हे सर्वश्रुत आहे. ते भारतीय कम्युनिस्ट पक्षाची (भाकप) विद्यार्थी शाखा असलेल्या एआयएएसएफमधून भाकपमध्ये सक्रिय झाले व २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत भाकपचे उमेदवार म्हणून बेगुलसरायमधून लढले, पण ते पराभूत झाले.

२०२४ मध्ये त्यांनी काँग्रेस पक्षात प्रवेश केला. काँग्रेस पक्षाने त्यांना बिहारमधून उमेदवारी देण्याचे ठरवले होते, पण लालू यादव यांनी कन्हैयाकुमार यांच्या उमेदवारीला विरोध केला त्यामुळे काँग्रेसने त्यांना उत्तर पूर्व दिल्ली लोकसभा मतदारसंघातून उमेदवारी दिली. त्यांचा तेथेही पराभव झाला.

नुकत्याच झालेल्या दिल्ली विधानसभा निवडणुकीत कन्हैयाकुमार यांनी काँग्रेससाठी भरपूर प्रचार केला, पण ७० जागांच्या विधानसभेत काँग्रेसला एकही जागा मिळवता आली नाही. काँग्रेसला ना राहुल गांधींचा उपयोग झाला, ना कन्हैयाकुमार यांचा.

आता काँग्रेस पक्षाने या अपयशी कन्हैयाकुमार यांना बिहार विधानसभेत सक्रिय करण्याचे ठरवले आहे. एनएसयूआयच्या वतीने बिहारमध्ये चालू असलेल्या पलायन रोको, नौकरी दो या अभियानात कन्हैयाकुमार सध्या सक्रिय दिसत आहेत.

काँग्रेसने बिहार प्रदेश काँग्रेसची जबाबदारी दलित आमदार राजेश कुमार यांच्यावर सोपवली आहे. मुख्यमंत्रीपदाचा चेहरा असलेला आपला पुत्र तेजस्वी यादव याला कोणी आव्हान देऊ शकेल, असा दुसरा नेता महाआघाडीत अन्य कोणत्याही मित्रपक्षात असता कामा नये, अशी दक्षता लालू यादव घेताना दिसत आहेत.

बिहारमध्ये सवर्ण किंवा उच्चवर्णीय मतदारांची संख्या नगण्य आहे. म्हणूनच दलित, मागासवर्गीय आणि अल्पसंख्य म्हणजेच मुस्लीम व्होट बँकेवर सर्वच राजकीय पक्षांची मदार असते. मुस्लीम मतदार हे भाजपाच्या विरोधात आहेत असे मानले जाते तरीही लोकसभा व विधानसभा निवडणुकीत मुस्लिमांची काही मते भाजपाला मिळाली आहेत, याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही.

नितीश कुमार मागास जातीतून आले आहेत. ते दोन दशकांहून अधिक काळ मुख्यमंत्रीपदावर आहेत पण त्यांच्यावर भ्रष्टाचाराचा एकही आरोप झालेला नाही. प्रचंड विरोध असूनही त्यांनी राज्यात दारूबंदी जारी केली. महिलांचा फार मोठा पाठिंबा त्यांना मिळाला.

नितीश कुमार यांच्या पाठीशी महिलांची व्होट बँक भक्कमपणे उभी आहे. रस्ते, वीज अशा विकासकामांत केंद्राचा निधी मोठा मिळाला आहे. पण शिक्षण, उद्योग, गुंतवणूक व रोजगार यात बिहार खूपच मागासलेला आहे. बिमारू राज्यात बिहारचा कायम नंबर आघाडीवर आहे. रोजगारासाठी अन्य राज्यांत वर्षानुवर्षे होत असलेले तरुणांचे पलायन नितीश कुमार थांबवू शकलेले नाहीत हे त्याचे मोठे अपयश आहे.

महाआघाडीतील मतभेद व असंतोषाचा पुरेपूर लाभ उठविण्याचे भाजपाने ठरवले आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी नुकत्याच झालेल्या बिहार दौ?यात येत्या विधानसभा निवडणुकीत एनडीएचे कप्तान नितीश कुमार हेच असतील असे पक्षाच्या बैठकीत जाहीर करून टाकले. भाजपा जे ठरवेल तोच एनडीएचा निर्णय असतो. त्यामुळे चिराग पासवान किवा जीतन राम मांझी यांच्या मताला काडीमात्र किंमत नसते.

बिहारमध्ये २४३ पैकी २२५ जागा जिंकण्याचे लक्ष्य भाजपाने ठरवले आहे. जी रणनिती भाजपाने महाराष्ट्रात राबवली तशीच आता बिहारमध्ये राबवली जात आहे. बिहारचे प्रभारी विनोद तावडे, बिहारचे दोन्ही उपमुख्यमंत्री सम्राट चौधरी व विजय सिन्हा, भाजपाचे प्रदेशाध्यक्ष दिलीप जैस्वाल तसेच पक्षाचे आमदार, खासदार यांच्या बैठकीत अमित शहा यांनी नितीश कुमार हे निवडणूक काळात एनडीएचे कप्तान राहतील असे जाहीर केले. त्यामुळे विधानसभा निवडणूक होईपर्यंत बिहारमध्ये एनडीएचे नंबर १ नेते नितीश कुमार असतील. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांचे बिहारमधील दौरे वाढले आहेत. प्रत्येक भेटीत पक्ष संघटनेला ऊर्जा देत आहेत. प्रत्येक दौऱ्यात ते राजदवर टीकेची झोड उठवताना लालू प्रसाद यादव यांनाच टार्गेट करीत आहेत.

अमित शहा यांची नुकतीच गोपालगंज येथे जंगी सभा झाली. ते म्हणाले - लालू को लाज नहीं, गाय का चारा खा गए, सिर्फ अपने परिवार को सेट किया, बिहार को तय करना हैं कि लालू - राबडी के जंगलराज की ओर जाना हैं या मोदी - नितीश के विकास की राह पर जाना हैं... अगर हमारी फिर से सरकार बनती है तो हम बिहार को बाढ से मुक्त करा देंगे, बंद चिनी मिलों को फिर शुरू करेंगे!

■ ■ ■

# ...आणि उठाव असा फसला!



जुलै - ऑगस्ट २०२४ मध्ये बांगलादेशात विद्यार्थ्यांनी आरक्षणविरोधी आंदोलन पुकारले. त्या आंदोलनाने नंतर हिंसक वळण घेतल्यामुळे पोलिसांना गोळीबार करावा लागला, त्यामध्ये अनेक आंदोलक मृत्यूमुखी पडले. शेख हसीना यांच्या नेतृत्वाखालील सरकारने विद्यार्थी नेत्यांबरोबर सामोपचाराने वाटाघाटी करून त्यावर वेळीच तोडगा न काढल्याने परिस्थिती हाताबाहेर गेली आणि स्वतःच्या सुरक्षेसाठी, शेख हसीना यांना बांगलादेशातून पळ काढावा लागला.बांगलादेशचे लष्कर प्रमुख वकार उज जमान यांनी शेख हसीना यांना सुरक्षितपणे बांगलादेशमधून बाहेर पडण्यास मदत केली.

-------------

अभय गोखले

------------------------

**कोण आहेत वकार उज जमान?**

बांगलादेशचे लष्कर प्रमुख असलेले वकार उज जमान हे शेख हसीना यांचे नातेवाईक आहेत. वकार यांची पत्नी,शेख हसीना यांच्या काकांची मुलगी आहे. वकार यांचे सासरे मुस्तफीजूर रेहमान हे काही वर्षांपूर्वी बांगलादेशचे लष्कर प्रमुख होते.

पाकिस्तानची गुप्तहेर संघटना इंटर सर्व्हिसेस इंटेलिजन्सने मध्यंतरी बांगलादेश लष्करातील लेफ्टनंट जनरल मोहंमद फैजूर रेहमान यांना हाताशी धरून लष्कर प्रमुख वकार उज जमान यांच्या विरोधात उठाव करण्याचा प्रयत्न केला होता. हा प्रयत्न भारताच्या सतर्कतेमुळे फसला असे बोलले जात आहे.

स्वराज्य मॅगझिन मध्ये उठावा संबंधी जी सविस्तर माहिती देण्यात आली आहे, त्यानुसार लेफ्टनंट जनरल फैजूर रेहमान हे जमाते इस्लामी या कट्टरपंथी पक्षाशी संबंधित आहेत.तसेच पाकिस्तानी लष्कराशी त्यांची जवळीक आहे. पाकिस्तानी गुप्तहेर संघटना इंटर सर्व्हिसेस इंटेलिजन्सशी त्यांचे निकटचे संबंध आहेत.

जुलै - ऑगस्ट मध्ये बांगलादेशात जे आरक्षण विरोधी आंदोलन झाले, त्याचे नेतृत्व करणारे विद्यार्थी नेते हे फैजूर रेहमान यांच्याशी जवळीक साधून आहेत. जानेवारी २०२५ मध्ये फैजूर रेहमान यांच्याच पुढाकाराने इंटर सर्व्हिसेस इंटेलिजन्सचे प्रमुख लेफ्टनंट जनरल असिम मलीक हे ढाका येथे आले होते. बांगलादेशचे लष्कर प्रमुख वकार उज जमान यांचा त्याला विरोध होता. परंतु बांगलादेश मधील हंगामी सरकारचे सल्लागार मोहंमद युनूस यांचा त्याला पाठींबा असल्याने वकार यांना काही करता आले नव्हते.

फैजूर रेहमान आणि असिम मलीक यांच्या भेटीमध्ये काय चर्चा झाली? त्या बाबत वकार उज जमान यांना अंधारात ठेवण्यात आले होते. बांगलादेश लष्करातील आणखी काही अधिकाऱ्यांचा फैजूर रेहमान यांना पाठिंबा असल्याची चर्चा होती.

इंटर सर्व्हिसेस इंटेलिजन्सचे प्रमुख आपल्या ढाक्यातील वास्तव्यात जमाते इस्लामीच्या काही नेत्यांना आणि आरक्षण विरोधी आंदोलनातील काही विद्यार्थी नेत्यांना भेटले होते.त्यानंतर लष्कर प्रमुख वकार उज जमान यांना त्यांच्या पदावरून हटवून त्यांच्या जागी फैजूर रेहमान यांना आणण्याची योजना आखण्यात आली.

उठावाची तयारी करण्यासाठी फैजूर रेहमान यांनी त्यांच्याशी जवळीक असलेल्या लष्करातील काही अधिकाऱ्यांबरोबर गुप्त बैठक घेतली. फैजूर रेहमान यांना चिफ ऑफ द जनरल स्टाफ लेफ्टनंट जनरल मिझानूर रेहमान शमीम यांचा पाठिंबा मिळवता आला नाही. आणखी काही अधिकाऱ्यांनी उठावाच्या योजनेला विरोध केला.त्यांचे असे मत होते की लष्कराने राजकारणापासून दूर रहायला हवे.

दरम्यान, वकार उज जमान यांच्या विरोधात अशाप्रकारचे कटकारस्थान शिजत असल्याचा सुगावा भारताला लागताच भारताने वकार उज जमान यांना सावध केले.

भारताने या सर्व घडामोडीं बाबत अमेरिकेला अवगत केले आणि हा उठाव यशस्वी झाल्यास फक्त बांगलादेशच अस्थिर होणार नाही तर त्या विभागात सुरक्षेच्या दृष्टिकोनातून समस्या निर्माण होतील, तसेच या उठावामुळे बांगलादेशातील कट्टर पंथीयांना बळ मिळेल आणि त्याचा परिणाम अमेरिकेलाही भोगावा लागेल, असे अमेरिकेच्या लक्षात आणून दिले.

त्यानंतर अमेरिकेने बांगलादेश मधील हंगामी सरकारचे मुख्य सल्लागार मोहंमद युनूस यांना संदेश पाठवला की अशा प्रकारची उठावाची योजना फलद्रूप होता कामा नये. दरम्यान, भारताने वकार उज जमान यांना अमेरिकन सुरक्षा यंत्रणेतील उच्च अधिकाऱ्याशी संपर्क साधण्यास मदत केली.

या सर्व घडामोडींची कुणकुण फैजूर रेहमान आणि त्यांच्या सहकाऱ्यांना लागताच त्यांनी आपली योजना अंमलात आणण्यासाठी घाई केली. लष्कर प्रमुख वकार उज जमान हे सेंट्रल आफ्रिकन रिपब्लिकला भेट देण्यासाठी बांगलादेशच्या बाहेर गेले असताना, उठाव करण्याचे ठरवण्यात आले. वकार उज जमान हे जेंव्हा बांगलादेशात परत येतील तेव्हा ढाका विमानतळावरच त्यांना अटक करण्याचे ठरवण्यात आले.

या योजनेची कुणकुण भारताला लागताच भारताने वकार उज जमान यांना सावध केले. फैजूर रेहमान आणि त्यांच्या सहकाऱ्यांची योजना उधळून लावण्यासाठी डावपेच आखण्यात आले. वकार उज जमान यांचे विमान ढाका ऐवजी तेजगाव एयर बेसला वळवण्यात आले. तेथे वकार यांच्या समर्थक लष्करी अधिकाऱ्यांनी त्यांचे स्वागत केले आणि त्यांना सुरक्षितपणे ढाका येथील आर्मी कॅन्टोन्मेंटमध्ये नेण्यात आले.

अशाप्रकारे लेफ्टनंट जनरल फैजूर रेहमान आणि त्यांच्या सहकाऱ्यांची उठावाची योजना उधळून लावण्यात आली. कटाचे प्रमुख सुत्रधार लेफ्टनंट जनरल फैजूर रेहमान यांना स्थानबद्ध करण्यात आले असून, त्यांच्या विरोधात लवकरच सेना न्यायालयात खटला चालवण्यात येईल.

अर्थात, अशा प्रकारच्या घडामोडी घडल्याचा इन्कार बांगलादेश लष्कराने केला आहे. त्यात आश्चर्य वाटण्यासारखे काही नाही. बिस्मार्कने एके ठिकाणी म्हटलं होतं की, नथींग इज ट्रू अनटिल, इट इज ऑफिशियली डिनाईड बिस्मार्कचे हे विश्लेषण या बाबतीत तंतोतंत लागू पडते.

लेफ्टनंट जनरल फैजूर रेहमान आणि त्यांच्या सहकाऱ्यांचा उठाव फसला असला तरी पाकिस्तान गप्प बसणार नाही. त्यांचे प्रयत्न सुरूच राहतील. त्यामुळे वकार उज जमान यांना सतर्क रहावे लागेल. अर्थात बांगलादेश लष्करासाठी उठाव आणि प्रतिउठाव या गोष्टी नवीन नाहीत.बांगलादेश लष्कराचा इतिहास त्याचा पुरेसा साक्षीदार आहे.

■ ■ ■

# मारहाण करून मराठी बोलायला भाग पाडणे योग्य आहे काय?

अतुल सोमेश्वर कावळे
९७३०५३५१९६
atulskawale@yahoo.co.in

अंधेरी (पश्चिम), वर्सोवा, मुंबई येथील डी मार्ट स्टोअरमधील एका कर्मचाऱ्याने एका मराठी ग्राहकाशी मराठीत बोलण्यास नकार दिला आणि आपण हिंदीतच बोलणार अशी अरेरावी केली.

सदर ग्राहक महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचा स्थानिक पदाधिकारी होता. त्यानंतर मनसेचे कार्यकर्ते डी मार्ट स्टोअरमध्ये गेले आणि त्या कर्मचाऱ्याला मारण्याची धमकी देत त्याला मराठीतून माफी मागण्यास भाग पाडले.

घटना तशी छोटीशीच आहे आणि मनसेच्या नेहमीच्या पठडीतील आहे. अशा अनेक घटना ह्याआधीही घडल्या आहेत आणि मनसेने आपल्या स्टाइलने त्याचा समाचारही घेतला आहे. पण मुख्य प्रश्न हा आहे की असे मनसे स्टाईल धमकावण्याने परप्रांतीय लोकं मराठीत संभाषण करतील की उलट मराठी भाषेचा आणखी दुस्वास करतील ?

अगदी निष्पक्षपणे सांगायचे तर डी मार्ट स्टोअरमधील त्या परप्रांतीय कर्मचाऱ्याचा एवढा दोष नाही जेवढे खुद्द मराठी माणसं दोषी आहेत. मराठी माणसं आपसांत सुद्धा आपल्या मातृभाषा मराठीत बोलत नाहीत. स्वभाषेत संभाषण करणे त्यांना मागासपणाचे वाटते. विशेषतः आंग्लाळलेली तरुण मराठी मुलं तर हटकून हिंदीतच संभाषण करतात.

ती हिंदी सुद्धा इंग्लिश शब्दबहुल असते. म्हणजे मराठी लोकांनाच आपल्या मातृभाषेबद्दल प्रेम नाही आणि मनसे कार्यकर्ते परप्रांतीयांवर मराठीत बोलण्याचा आग्रह करत आहेत आणि न बोलल्यास मारहाण करण्याच्या धमक्या देत आहेत.

मनसे कार्यकर्त्यांनी आधी मराठी लोकांना मराठी भाषेत बोलण्यास भाग पाडावे आणि जो मराठी माणूस मराठीत न बोलता हिंदीत बोलेल त्याच्या कानशिलात लावण्याची हिंमत दाखवावी. असे जर मनसे कार्यकर्ते करू शकत असतील तरच त्यांचे मराठी भाषेवरील प्रेम अस्सल आहे असे म्हणता येईल. अन्यथा हा मनसेचा फक्त प्रकाशझोतात राहण्याचा एक सवंग प्रकार आहे ह्या पलीकडे अशा धमकावण्याला काही किंमत नाही.

अलीकडेच २७ फेब्रुवारी रोजी जागतिक मराठी भाषा दिवस साजरा झाला. हा दिवस दरवर्षी येतो आणि जातो ह्यापलीकडे ह्या दिवसाचे औचित्य उरलेले नाही. ह्या दिवसानिमित्त वर्तमानपत्रांमध्ये फुटकळ लेख लिहिले जाऊन मराठी भाषेविषयी प्रेम आणि कळकळ व्यक्त केली जाते. बस्स एवढेच होते, त्यापलीकडे काही नाही. उलट तिकडे इस्त्राईल देशात मात्र जागतिक मराठी भाषा गौरव दिवस मोठ्या उत्साहाने तेथील मराठी भाषिक ज्यु बांधव साजरा करतात. पण त्याची इकडे महाराष्ट्रात मात्र बातमी होत नाही.

मोझेस इन इस्त्राईल नामक यू ट्यूब चॅनलवर ह्याबद्दलची संपूर्ण माहिती मिळते. रेव्हिटल मोझेस नामक ज्यु भगिनी हे चॅनेल चालवते. अस्खलित मराठीत बोलणारे हे मराठी भाषिक बेने इस्त्राईली ज्यु बांधव बघून मराठीच्या अभिमानाने उर भरून येतो. छ. शिवाजी महाराजांवरील त्यांचे निस्सीम प्रेम बघून आणि महाराजांबद्दलचा त्यांचा अभिमान बघून तर अक्षरशः डोळ्यांत पाणी येते.

शेकडो वर्षांपूर्वी आपल्या मायभूमीतून परागंदा झालेले काही ज्यु भारतात विशेषतः महाराष्ट्रात आले आणि इथेच स्थायिक झाले. महाराष्ट्रातील मराठी माणसांनी ह्या मातृभूमी गमावलेल्या ज्युंना सर्वतोपरी मदत केली आणि मोठ्या बंधुभावाने त्यांना आपल्यात सामावून घेतले. ह्या ज्युंनी सुद्धा मराठी भाषा आणि मराठी संस्कृती पूर्णपणे आत्मसात करून घेतली आणि आपली मूळ ओळख जपून सुद्धा महाराष्ट्राच्या जनजीवनाशी ते एकरूप झाले.

सन १९४८ साली इस्त्राईल देश पुन्हा अस्तित्वात आल्यावर बरेचसे मराठी भाषिक ज्यु बांधव आपल्या मायभूमीत इस्त्राईलमध्ये जाऊन स्थायिक झालेत. पण तिथे गेल्यावरही ते महाराष्ट्र, मराठी भाषा आणि मराठी संस्कृतीला विसरले नाहीत.

ह्या ज्युंनी आपल्या उपकारकर्त्या मराठी माणसांचे ऋण न विसरता इस्त्राईलमध्ये गेल्यानंतर तिथे सुद्धा मराठी भाषा आणि मराठी संस्कृती रुजविण्याचे आणि त्यांच्या पुढील पिढ्यांमध्ये ते हस्तांतरित करण्याचे सुद्धा कार्य चालवले आहे. त्यांनी त्यांच्या मुलांना मराठी भाषेतून शिक्षण देण्यासाठी मराठी शाळा उघडल्या आहेत.

भारत, महाराष्ट्र, मराठी माणसं, मराठी भाषा, मराठी साहित्य, मराठी संस्कृती, मराठी खानपान, छ. शिवाजी महाराज आणि छ. संभाजी महाराज, हिंदवी स्वराज्य आणि उत्तरकाळात स्थापन झालेले मराठा साम्राज्य ह्यांचा इतिहास आपल्या भावी पिढीला शिकविण्यासाठी हे मराठी भाषिक ज्यु बांधव कसोशीने प्रयत्न करत आहेत.

आपल्या उपकारकर्त्यांचा इतिहास आपल्या पुढच्या पिढीपर्यंत पोहोचावा आणि त्यांनीसुद्धा आपल्या पूर्वजांच्या उपकारकर्त्यांच्या प्रति नेहमी कृतज्ञ असावे म्हणून ह्या मराठीभाषिक ज्यु बांधवांचे चाललेले प्रयत्न अत्यंत कौतुकास्पद आहेत.

त्यांच्या ह्या प्रयत्नाला नक्कीच यश येईल ह्याबद्दल त्यांचा आत्मविश्वास पाहून खात्री वाटते. पण खुद्द इथे महाराष्ट्रात मात्र मराठी माणसांचीच आपल्या मातृभाषेबद्दल दिवसेंदिवस अनास्था वाढत चालली आहे. मग दोषी कोण ? मराठी माणूस की परप्रांतीय?

मी ज्या खाजगी कंपनीत काम करतो त्या कंपनीच्या कार्यालयातील बहुसंख्य मराठी माणसं आपसांत सुद्धा हिंदीत बोलतात, मराठीत बोलत नाहीत. मी त्यांना मराठीत बोलण्याचा आग्रह केला की ते माझ्यावर फिदीफिदी हसतात.

कंपनीचे तिन्ही मालक मारवाडी असूनही ते आवर्जून सगळ्या स्टाफशी मराठीतच बोलतात. पण आपलेच मराठी लोकं त्यांच्याशी सुद्धा हिंदीत बोलतात. माझा एक सहकारी कर्मचारी मूळचा झारखंडचा आहे. तो मात्र आवर्जून मराठीत बोलतो. त्याचे अतिशय कौतुक वाटते. पण मराठी लोकं त्याच्याशी सुद्धा हिंदीत बोलतात.

एखादा परप्रांतीय मराठीत बोलण्याचा प्रयत्न करतो तेव्हा आपलेच मराठी लोकं त्याच्याशी हिंदीत संभाषण सुरू करतात. त्यामुळे खरे गुन्हेगार मराठी लोकच आहेत. उगीच परप्रांतियांना दोष देण्यात, शिव्या घालण्यात, त्यांना मारहाण करण्यात अर्थ नाही. अशाने त्यांच्या मनात मराठी भाषाच नव्हे तर तमाम मराठी लोकं आणि महाराष्ट्राबद्दल घृणा निर्माण होईल.

माझी एक सहकारी कर्मचारी मुलगी मध्य प्रदेशातील आहे. तिला मराठी येते पण तरीही ती मराठीत बोलत नाही. मी तिला कैक वेळा मराठीत बोलण्याचा आग्रह केला. पण तरीही ती मुद्दामहून हिंदीतच बोलते. मग मीही तिच्याशी आवर्जून आणि हटकून मराठीतच बोलतो. ती हिंदीत आणि मी मराठीत एकमेकांशी बोलतो.

मराठी माणसांनी मनसे कार्यकर्त्यांसारखे दुसऱ्यांना मराठी भाषेत बोलण्यासाठी धमकावून मराठी माणसांची, महाराष्ट्राची, मराठी महापुरुषांची आणि मराठी भाषेची पत घालवण्यापेक्षा समोरचा कोणत्याही भाषेत बोलत असला तरी आपण मुद्दामहून, आवर्जून, हटकून आणि मुजोरीने मराठीतच बोलले पाहिजे. मग बघा दुसरे लोकं मराठीत बोलणे सुरू करतात की नाही ते?

■ ■ ■

## वाचक लिहितात

### आयपीएल सामन्यांदरम्यानच्या जाहिराती

सध्या आयपीएलचे सामने सुरु आहेत. जीओ हॉटस्टारने या सामन्यांच्या थेट प्रक्षेपणाचे हक्क खरेदी करून त्यांच्या अँपवर सामन्यांचे विनामूल्य प्रक्षेपण केले आत असल्याने प्रतिदिन हे सामने आठ ते दहा कोटी लोक लाईव्ह पाहत असतात ज्यामध्ये वयोवृद्धांपासून शाळकरी मुलांचाही सहभाग असतो. प्रत्येक षटक झाल्यावर, खेळाडू बाद झाल्यावर, स्ट्रॅटेजिक टाइम आउट झाल्यावर लगेचच जाहिरात सुरु होते.

यातील जवळपास सर्वच जाहिराती या गुटखा, पानमसाला आणि कोणत्या ना कोणत्या जुगार खेळण्यास प्रवृत्त करणाऱ्या ऑनलाईन अँप्सच्या असतात. एरव्ही कधीतरी दिसणाऱ्या या अँप्सच्या जाहिरातींचा लाईव्ह सामन्यांच्या दरम्यान सातत्याने मारा केला जात आहे ज्याचा परिणाम हे सामने पाहणाऱ्या शालेय विद्यार्थ्यांवर आणि महाविद्यालयीन तरुण तरुणींवर होऊ शकतो. गुटखा, तंबाखूयुक्त पानमसाला यांवर महाराष्ट्रासह अनेक राज्यांत बंदी आहे, तरीही ते खाणाऱ्यांची संख्या प्रचंड आहे. गुटखा, तंबाखू यांमुळे कर्करोगासारखे जीवघेणे रोग होतात तर ऑनलाईन जुगाराच्या नादी लागून आजतागायत कित्येकांचे आयुष्य उध्वस्त झाले आहे. सरकारला या दोन्ही गोष्टींतून वारेमाप कर मिळतो त्यामुळे सरकार त्यावर कोणतेही बंधन आणत नाही; मात्र अशा समाजविघातक जाहिरातींमुळे शालेय मुले, तरुण त्यांच्या आहारी जाऊन आपल्यासह आपल्या कुटुंबाची हानी करू शकतात याचा विचार कोण करणार ?

■ जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई.


### श्रीराम रक्षा स्तोत्राचे महत्व!

श्रीरामाचे नवरात्र चैत्र शुक्ल प्रतिपदा (गुढीपाडवा) ते चैत्र शुक्ल नवमी (श्रीराम नवमी) पर्यंत असते. या काळात भाविक रामायणाचे पठण करतात, श्रीरामाचे गौरव करणारे स्तोत्र (रामरक्षा स्तोत्र ) पठण करतात, त्यांच्या स्तुतीमध्ये भजन,कीर्तन करतात.

रामरक्षा बुधकौशिक ऋषींनी लिहिलेले आहे. खरेतर रामरक्षा हा एक मंत्रच आहे. रामरक्षेच्या सुरुवातीला अस्य श्रीरामरक्षास्तोत्रमंत्रस्य सांगितलेले आहे. मंत्र म्हणजे एक ध्वनी, एक अक्षर, एक शब्द किंवा शब्दांचा समूह. ज्या वेळी ठराविक लयीत अन् सुरात एखादा मंत्र जपला जातो, त्या वेळी त्या जपातून एक विशिष्ट शक्ती निर्माण होते. याकरता रामरक्षा एका विशिष्ट लयीत म्हणणे आवश्यक आहे. रामरक्षा पठण केल्याने पठण करणाऱ्या व्यक्तीभोवती सूक्ष्म स्तरावरील संरक्षककवच निर्माण होऊन तिचे अनिष्ट शक्तींपासून रक्षण होते.

या स्तोत्राच्या पठणाने मानसिक, शारीरिक आणि आध्यात्मिक बळ मिळते. नकारात्मक ऊर्जा, भय आणि वाईट शक्तींवर विजय मिळवता येतो.राम नामाच्या सतत उच्चाराने मन शांत होते आणि सकारात्मक ऊर्जा प्राप्त होते. दररोज रामरक्षा स्तोत्राचे पठण करायला हवे.

■ सौ. प्रिया बागडदेव, छिंदवाडा.



# उन्हाळ्यात कशी घ्यावी डोळ्यांची काळजी?

उन्हाळ्याला सुरूवात होताच आरोग्याची काळजी घ्यावी लागते. घराबाहेर पडताना योग्यरित्या हायड्रेटेड नाही राहिल्यामुळे उष्मघाताच्या आणि आरोग्याशी संबंधित समस्या होऊ शकतात. उन्हाळ्यात त्वचेशी संबंधित समस्या वाढत असताना, उन्हात बाहेर पडल्याने डोळ्यांच्या अनेक समस्या उद्भवतात.

आपले डोळे आपल्या शरीरातील महत्त्वाच्या भागांपैकी एक मानला जातो. त्यामुळे उन्हाळ्यात डोळ्यांची विशेष काळजी घेतली पाहिजे.

उन्हाळ्यात डोळ्यांच्या अॅलर्जीची समस्या वाढते आणि डोळे लाल होतात. याचे मुख्य कारण म्हणजे वातावरणातील आर्द्रता आणि प्रदूषण, जे आपल्या डोळ्यांसाठी हानिकारक आहे. या कारणामुळे डोळ्यांना लवकर संसर्ग होतो. डोळ्याचा भाग संवेदनशील असल्यामुळे त्याची योग्य रित्या काळजी नाही घेतल्यास तुम्हाला अनेक समस्यांना सामोरं जावा लागते.

**हात स्वच्छ ठेवा :** डोळे सुरक्षित ठेवण्यासाठी, आपण आपले हात स्वच्छ ठेवणे सर्वात महत्वाचे आहे. घाणेरड्या हातांनी डोळ्यांना स्पर्श केल्याने बॅक्टेरिया डोळ्यांत प्रवेश करतात, ज्यामुळे संसर्ग होऊ शकतो. म्हणून, जेव्हाही तुम्ही बाहेरून परताल तेव्हा प्रथम तुमचे हात धुवा आणि नंतर डोळ्यांना स्पर्श करा. याशिवाय, दुसऱ्याचा रुमाल वापरू नका. नेहमी तुमचा स्वच्छ रुमाल वापरा.

**सूर्यकिरणांपासून संरक्षण :** सूर्यप्रकाशातून निघणारे अतिनील किरण आपल्या डोळ्यांना नुकसान करतात, म्हणून बाहेर पडताना नेहमी गॉगल घालात जेणेकरून तुमचे डोळे सुरक्षित राहतील.

**चांगल्या जीवनशैलीची काळजी :** योग्य जीवनशैली आणि संतुलित आहार खूप महत्त्वाचा आहे. चुकीच्या आहारामुळे अनेक आरोग्य समस्या उद्भवतात, ज्या डोळ्यांसाठी देखील हानिकारक ठरू शकतात. म्हणून, जंक फूड टाळा आणि संतुलित आहार घ्या, जेणेकरून तुमचे डोळे देखील निरोगी राहतील.

**या गोष्टींकडे लक्ष पुरवा**

दररोज पाण्याने डोळे धुणे कधीकधी आपल्या डोळ्यांसाठी हानिकारक ठरू शकते. जर तुम्ही वारंवार पाण्याने डोळे धुतले तर डोळ्यांच्या नसा कोरड्या होऊ शकतात. त्यामुळे डोळ्यांत घाण असेल तरच पाणी वापरा.

■ ■ ■

## अशोकायन

प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)



### भूकंप

नैसर्गिक आपत्तीपुढे
माणूस होतो हतबल
अशावेळी एकमेका मदत
देऊन जाते आत्मबल...

मानवतेची ओळख
अशाच प्रसंगी होते
धर्म प्रांताच्या पलीकडचे
असते हे वैश्विक नाते..!

जातपात धर्म देश
असो कोणताही
मानवता धर्माचे पालन
जगी सर्वश्रेष्ठ राही..!

# रेल्वे लाईनमुळे विभागले शहर

## रेल्वे गेटवर ताटकळणे धामणगाव वासियांसाठी रोजचंच दुखणं




**सलील काळे**

**धामणगाव रेल्वे,( दि.2 )** – महाराष्ट्राच्या अमरावती जिल्ह्यात गजबजलेले आणि जुनी बाजारपेठ असलेले धामणगाव हे ब्रिटिश काळात स्थापन झालेल्या मध्यरेल्वे लाइनवर असलेले महत्वाचे शहर आहे. येथे अत्यंत वर्दळ असलेले रेल्वे स्थानक असल्याने हे शहर भौगोलिक दृष्ट्या विभागले गेले आहे. पूर्वी एकसंघ असलेल्या या शहराचे रेल्वेलाईन मुळे दोन भागांमध्ये विभाजन झाले. रेल्वेमार्ग, शहराच्या व्यापार आणि दळणवळणासाठी महत्वाचा असला तरी तो मोठा अडथळाही ठरत आहे. कितीही महत्वाचे काम असले तरी रेल्वे गेटवर ताटकळणे धामणगाव वासियांसाठी रोजचंच दुखणं ठरत आहे.

आज 120 वर्षांनंतरही त्यावर ठोस उपाययोजना करण्यात आली नाही. गावकरी आणि व्यापारी रेल्वे ओव्हर ब्रिज (आरओबी) च्या मागणीसाठी अनेक वर्षांपासून संघर्ष करताहेत. मात्र प्रशासनाच्या दिरंगाईमुळे आणि कायदेशीर अडचणींच्या सबबीमुळे हा गंभीर प्रश्न आजही सुटलेला नाही.




### शहराचे दोन भाग

हा रेल्वे मार्ग आमच्यासाठी बॅरीकेटींग सारखा आहे, असे धामणगाव येथील व्यापारीवर्ग व सामान्य जनता सांगते. व्यवसायाचे ठिकाण (दुकान) आणि घर सुध्दा मुख्य बाजारपेठेपासून विलग झाले आहे. शहराच्या एका बाजूला संपूर्ण शासकीय कार्यालये तर दुसऱ्या बाजूला मुख्य बाजारपेठ आणि शैक्षणिक संस्था, अश्या बिकट समस्येवर आम्ही दशकानुदशके उपाय शोधत आहोत. असे उद्विग्न उद्गार जनतेच्या तोंडून ऐकायला मिळतात. एकप्रकारे जनतेच्या नशिबी आलेले हे दुर्दैवी आजारणच आहे.

### अपुरा अंडरब्रिज, वाहतुकीचा खोळंबा

धामणगाव रेल्वे स्थानकामुळे नागरीकांना अनेक समस्यांचा सामना करावा लागत आहे. मोठ्या वाहनांसाठी प्रवेश योग्य नसलेला गौरक्षण संस्थेच्या जवळील अंडर-ब्रिज वाहतुकीच्या गरजांसाठी अपुरा आहे. ट्रक, मोठ्या गाड्या आणि सरकारी बसेस यांना तो ओलांडता येत नाही. परिणामी, ही वाहने रेल्वे फाटकावरच थांबतात, त्यामुळे प्रचंड वाहतूक कोंडी होते.

### मालधक्क्यामुळे जड वाहतूक

स्टेशनला लागून असलेल्या मालधक्क्यात प्रचंड प्रमाणात अवजड ट्रक ये-जा करतात. परंतु, अपुऱ्या पायाभूत सुविधांमुळे वाहतूक व्यवस्थेवर त्याचा अतिरिक्त ताण पडतो. मुसळधार पावसामुळे निर्माण होणारी अडचण, अंडर-ब्रिज शहराच्या मुख्य भागाबाहेर आहे. पावसाळ्यात येथे सतत पाणी साचून रहाते. ज्यामुळे लहान वाहनांनाही तो ओलांडता येत नाही. परिणामी वाहतूक विस्कळीत होते. याउलट, नागपूरसारख्या शहरांमध्ये फ्लायओव्हरचे अतिरिक्त नियोजन करण्यात आले . जिथे वाहतूक समस्या तुलनेने कमी होत्या आणि जिथे फ्लायओव्हर ची गरज नाही तिथे सुद्धा फ्लायओव्हर बांधण्यात आले मात्र धामणगावसाठी अत्यावश्यक असलेला फ्लायओव्हर अद्याप बांधण्यात आलेला नाही. स्थानिक नेतेमंडळी तसेच रेल्वे प्रशासनाने याकडे सपशेल दुर्लक्ष केले आहे.

### फ्लायओव्हरची मागणी

धामणगावच्या नागरिकांचा ठाम विश्वास आहे की फ्लायओव्हर हाच समस्या निवारणाचा एकमेव उपाय आहे. तथापि, रेल्वे मालमत्ता (बेकायदेशीर कब्जा प्रतिबंध) अधिनियम, 1965 अंतर्गत रेल्वेच्या मालकीच्या जमिनींवर कोणतेही बांधकाम करणे गुन्हा मानला जातो. तरीही, सामाजिक कार्यकर्त्यांचे म्हणणे आहे की रेल्वे कल्याण निधी (Railway Welfare Fund) च्या माध्यमातून हा फ्लायओव्हर चा प्रकल्प पूर्ण करावा. वर्धेचे खासदार आणि मतदार संघातील आमदार यांच्याकडे अनेक वेळा निवेदने देऊन व गाऱ्हाणे गाऊन यावर कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही. नगरपालिका प्रशासनाने देखील हा विषय रेल्वे विभाग आणि राज्य सरकार यांच्याकडे ढकलला आहे.

### अनेक अपघाताच्या घटना

मध्य रेल्वे विभागातील धामणगाव रेल्वे स्थानक 20व्या शतकाच्या सुरुवातीस तयार करण्यात आले. यामुळे शहराच्या आर्थिक वाढीला चालना मिळाली, परंतु त्याच वेळी रेल्वे लाईनमुळे शहराचे दत्तापूर आणि धामणगाव असे दोन भागांमध्ये विभाजन झाले. यामुळे दैनंदिन प्रवास, शालेय विद्यार्थ्यांची मोठ्या प्रमाणात दररोज %ये - जा%, वाहतूकीची वर्दळ आणि आपात्कालीन सेवांमध्ये अडथळे निर्माण झाले. अनधिकृत रेल्वे क्रॉसिंग करताना होणारे अपघात आणि वाहतुकीचा खोळंबा हा येथे नित्याचाच भाग बनला आहे.



# रात्री उशिरापर्यंत चालला धान्य लिलाव

## कृ.उ. बा.समितीत गर्दी वाढल्याने घेतला निर्णय

**महासागर प्रतिनिधी**

**वरुड, (दि.2 )-** येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या धान्य लिलाव मंडीत 1 एप्रिल 2025 रोजी शेतकऱ्यांनी आपला शेतमाल विक्रीसाठी आणून मोठी गर्दी होती. धान्याची आवक अचानक वाढल्याने बाजार समितीच्या कर्मचाऱ्यांना रात्री उशिरापर्यंत शेतमालाची मोजणी करावी लागली. या लिलावात शेतकऱ्यांना त्यांच्या शेतमालाला उच्च भाव मिळाल्याने शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त केले. बाजार समितीच्या अधिकाऱ्यांनी सांगितले की, धान्याच्या वाढत्या आवकचा परिणाम म्हणून लिलाव प्रक्रिया व्यवस्थित पार पाडण्यासाठी अतिरिक्त कर्मचारी नियुक्त करण्यात आले आहेत. शेतकऱ्यांनी प्रामुख्याने गहू, हरभरा, तूर आणि सोयाबीन यांसारख्या पिकांचा शेतमाल विक्रीसाठी आणला, या पिकांना मागील काही दिवसांच्या तुलनेत चांगला भाव मिळाला. शेतकऱ्यांचा उत्साह पाहता, बाजार समितीने शेतमालाची योग्य नोंदणी आणि लिलाव प्रक्रिया पारदर्शकपणे पार पाडण्यासाठी विशेष काळजी घेतली. काही शेतकऱ्यांनी सांगितले की, या वर्षी पिकांचे उत्पादन चांगले झाले असून, बाजारात मिळणारा उच्च भाव त्यांच्यासाठी फायदेशीर ठरला आहे.



### शेतमाल व्यवस्थितपणे मंडीत आणावा

बाजार समितीचे सभापती बबलू पावडे व संचालक राजेश गांधी तसेच बाजार समिती चे संचालक मंडळ यांनी या दरम्यान शेतकऱ्यांना आवाहन केले आहे की, शेतकऱ्यांनी आपला शेतमाल व्यवस्थितपणे मंडीत आणावा, लिलाव प्रक्रियेत कोणताही अडथळा येणार नाही. पुढील काही दिवसांतही धान्याची आवक कायम राहण्याची शक्यता आहे, बाजारातील भाव स्थिर राहतील, अशी आशा आहे.

# खासगी क्रीडा अकादमींनी आर्थिक सहाय्यासाठी अर्ज करा

## जिल्हा क्रीडा अधिकारी यांचे आवाहन

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 2 ) –** राज्यातील क्रीडा संस्कृतीला प्रोत्साहन देण्यासाठी आणि प्रतिभावान खेळाडू तयार करण्यासाठी मिशन लक्ष्यवेध योजना सुरू केली आहे. यासाठी इच्छुक संस्थांनी अर्ज करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.

राज्यातील निवडक खासगी क्रीडा अकादमींना आर्थिक सहाय्य देऊन त्यांचे सक्षमीकरण करण्यात येणार आहे. यात ॲथलेटिक्स, आर्चरी, बॅडमिंटन, बॉक्सिंग, हॉकी, लॉन टेनिस, रोईंग, शूटिंग, सेलिंग, टेबल टेनिस, वेटलिफ्टिंग आणि कुस्ती अशा 12 क्रीडा प्रकारांचा समावेश आहे. या क्रीडा प्रकारांमधील उत्कृष्ट खेळाडू निर्माण करणाऱ्या खासगी अकादमींना आर्थिक सहाय्य दिले जाणार आहे. आर्थिक सहाय्य देण्यासाठी अकादमींचे निकषांवर मूल्यांकन केले जाईल. यात खेळाडू, क्रीडा मार्गदर्शक, सहाय्यक प्रशिक्षक, पायाभूत सुविधा, क्रीडा साहित्य आणि अकादमीच्या कामगिरीचे गुणांकन यांचा समावेश आहे. अकादमींना त्यांच्या गुणानुसार अ, ब आणि क वर्गामध्ये विभागले जाईल.

'क' वर्ग अकादमींना वार्षिक 10 लाख रुपये, 'ब' वर्ग अकादमींना 10 लाख रुपये आणि 'अ' वर्ग अकादमींना 30 लाख रुपये आर्थिक सहाय्य देण्यात येईल. हे सहाय्य पायाभूत क्रीडा सुविधा उभारणे, प्रशिक्षक मानधन आणि क्रीडा उपकरणे खरेदी करण्यावर खर्च करावा लागणार आहे. इच्छुक संस्थांनी अधिक माहिती आणि अर्जाच्या नमुन्यांसाठी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधून लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी गणेश जाधव यांनी केले आहे.

# विलास पाटील जामगांव सेवा सहकारी सोसा.च्या संचालक पदी अविरोध

**महासागर प्रतिनिधी**

**वरुड,( दि.2 )-** जामगाव खडका येथील सेवा सहकारी सोसायटीची निवडणूक प्रक्रीयेत छाननी दरम्यान विरोधकांचे अर्ज बाद झाल्याने विलास पाटील यांची अविरोध निवड झाली.

तालुकाअंतर्गत जामगाव खडका येथील सेवा सहकारी सोसायटीची निवडणूक नुकतीच जाहीर झाली. या निवडणुकीमध्ये नामनिर्देशन पत्र दाखल करण्याची अंतिम तारीख ही 28 मार्च होती. या तारखेपर्यंत जवळपास 29 नामनिर्देशन पत्र दाखल झाले होते. या अर्जाची छाननी 1 एप्रिल रोजी करण्यात आली. यामध्ये विलास पाटील यांच्या विरोधात सुभाष तुकाराम युवनाते व महादेव तायवाडे या दोघांचे उमेदवारी अर्ज होते. छाननीअंती या दोघांचे उमेदवारी अर्ज निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी नामंजूर केल्यामुळे



विलास पाटील हे अविरोध झाले आहे. त्यांच्या या अविरोध निवडून येण्यामुळे गावातील नागरिकांनी विलास पाटील यांचे अभिनंदन केले आहे. जामगाव सेवा सहकारी सोसायटीची निवडणूक ही तालुक्याच्या दृष्टिकोनातून खूप महत्त्वाची असते. या निवडणुकीत प्रतिस्पर्धी दोन पॅनल आहे. अनुसूचित जाती जमाती मधून पत्रकार विलास पाटील यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला होता. त्यांच्या विरोधात प्रतिस्पर्धी गटाचे दोन उमेदवार निवडणूक रिंगणात होते. अशातच दोन्ही उमेदवारावर कर्ज असल्यामुळे निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी त्या दोघांचेही उमेदवारी अर्ज नामंजूर केले. त्यामुळे पत्रकार विलास पाटील हे अविरोध निवडून आले आहे. त्यांच्या या निवडीबद्दल जामगाव सेवा सहकारी सोसायटीचे निंभोरकर गटाचे बंडू निंभोरकर, सचिन घोंगडे, कैलास निंभोरकर, अमोल निंभोरकर, निखिल निंभोरकर, बंटी निंभोरकर तसेच राजू निंभोरकर, माजी जिल्हा परिषद सदस्य बाळासाहेब सोलव, नामदेव ठाकरे, टेकचंद बारस्कर, रुपेश राऊत, ज्ञानेश्वर इंगोले, ज्ञानेश्वर गोहाड, पियुष बांबल, पंकज बांबल, ज्ञानेश्वर चौधरी, विजय पटोडे, यशवंत खडसे, विजय बांबल, लीलाधर बारस्कर यांनी अभिनंदन केले आहे.

# महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेची आज निवडणूक

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 2 )–** महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेच्या निवडणूक गुरुवार, दि. 3 एप्रिल रोजी होत आहे. सर्व नोंदणीकृत वैद्यकीय व्यावसायिकांनी मतदानाचा हक्क बजावावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

सदर निवडणुकीचे मतदान दि. 3 एप्रिल रोजी सकाळी 8 ते सायंकाळी 5 वाजे दरम्यान होणार आहे. सर्वोच्च न्यायालयाने SLP N0.8576/ 2025 या याचिकेमध्ये विद्यमान निर्वाचन अधिका-यांऐवजी नवीन निर्वाचन अधिकारी तात्काळ नियुक्त केल्यास निवडणुक प्रक्रीया पुढे सुरू ठेवता येईल असे निर्देश दि. 2 एप्रिलच्या आदेशान्वये दिले आहेत. सदर आदेश विचारात घेता, महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेच्या निवडणुका घेण्याकरीता सुनिलकुमार धोंडे, अवर सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई यांची नियुक्ती निर्वाचन अधिकारी म्हणून करण्यात आली आहे. महाराष्ट्र वैद्यकीय निवडणूक-2025 च्या अनुषंगाने सर्व नोंदणीकृत वैद्यकीय व्यावसायीकांनी महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेची निवडणूक नियोजित वेळापत्रकानुसारच होणार असल्याने गुरुवार, दि. 3 एप्रिल 2025 रोजी मतदानाचा हक्क बजावावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# सहकार क्षेत्रातील निःस्वार्थी योद्धा हरवला

## अरूण डुबे यांचे निधन

**धामणगाव रेल्वे** – धामणगाव रेल्वे सहकार क्षेत्राच्या इतिहासात एक अत्यंत आदरणीय व्यक्तिमत्त्व असलेल्या अरूण डुबे यांच्या दु:खद निधनाने संपूर्ण परिसर शोकसागरात बुडाला आहे. आयुष्यभर सहकार आणि सामाजिक कार्याच्या माध्यमातून निस्वार्थी सेवा केली. त्यांचे नाव घेतल्यावर सात्त्विकता, आतिथ्यशीलता आणि कर्तव्यदक्षता यांचा प्रत्यय येतो. अरूण डुबे यांची गेल्या काही महिन्यांपासून प्रकृती खालावत होती. त्यांनी 1 एप्रिल 2025 रोजी वयाच्या 76 व्या वर्षी अखेरचा श्वास घेतला. त्यांच्या निधनाने समाजातील एका सुसंस्कृत, अभ्यासू आणि माणुसकी जपणाऱ्या नेतृत्वाची उणीव निर्माण झाली आहे.



धामणगाव रेल्वे मतदारसंघातील कृषी उत्पन्न बाजार समितीचे दीर्घकाळ सभापती राहण्याचा बहुमान त्यांना मिळाला होता. त्यांच्या कार्यकाळात शेतकऱ्यांसाठी महत्त्वपूर्ण निर्णय घेतले गेले. राजकारणात असूनही त्यांनी कधीही व्यक्तिश: लाभाचा विचार केला नाही. लोकसेवा हेच त्यांचे ध्येय होते.

# अब्दुल आकीब हत्या प्रकरणातील चौथ्या आरोपीला अटक

## 15 महिन्यापासून होता फरार

**महासागर प्रतिनधी**

**अमरावती, ( दि. 2 )–** राजापेठ पोलिस ठाण्याच्या हद्दीतील अब्दुल आकीब हत्या प्रकरणात गुन्हे शाखा युनिट क्रमांक 1 च्या पथकाने फरार आरोपीला 1 एप्रिल रोजी अमरावती जिल्हा मध्यवर्ती कारागृहाजवळील परिरातून अटक केली. शेख अर्शद शेख हनीफ (24, रा. साद नगर, नवाबी स्कूलजवळ, अमरावती) असे आरोपीचे नाव आहे. हा आरोपी गेल्या पंधरा महिन्यापासून फरार होता.

### असे आहे प्रकरण

साक्षगंध तोडल्याच्या कारणावरून आरोपीने राजापेठ हद्दीतील प्रभादेवी मंगल कार्यालयाजवळील ईच्छा रिफ्रेशमेंट परिसरात अब्दुल चाकूने मारुन हत्या केली होती. याप्रकरणात 23 नोव्हेंबर 2024 रोजी फुलसूम अंजूम वल्द अब्दूल वहाब (50, रा. नालसाबपुरा, अमरावती) यांच्या तक्रारीवरुन राजापेठ पोलिस ठाण्यात आरोपीविरुध्द हत्येच्या कलमान्वये गुन्हा नोंदविला होता. सदर गुन्ह्यात राजापेठ पोलिसांनी 3 आरोपीतांना अटक केली होती, परंतु आरोपी नामे शेख अर्शद शेख हनीफ हा घटनेपासून फरार होता.

# यशवंत पंचायतराज अभियानात अमरावती जि. प. विभागात अव्वल

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती( दि.2 )** – प्रशासकीय व्यवस्थापन व विकासकार्यात उत्तम काम करणाऱ्या जिल्हा परिषद व पंचायत समित्यांना यशवंत पंचायतराज अभियान पुरस्कार योजनेंतर्गत 2024-25 चा विभागीय स्तरीय निकाल जाहीर झाला आहे. यामध्ये अमरावती जिल्हा परिषद विभागात प्रथम आली असून, याशिवाय जिल्ह्यातील तिवसा व अंजनगाव सुर्जी या दोन पंचायत समित्यांनी अनुक्रमे प्रथम आणि द्वितीय क्रमांक पटकाविला आहे, तर बुलढाणा जिल्ह्यातील शेगाव पंचायत समिती विभागात तृतीय आली आहे.

विशेष म्हणजे सन 2023-24 मध्येही अमरावती जिल्हा परिषद विभागात प्रथम आलेली आहे. राज्यामधील विकासाच्या सर्व योजना पंचायतराज संस्थांमार्फत राबविल्या जातात. यासाठी राज्यात पंचायतराज संस्थांमधून प्रशासकीय व्यवस्थापन व विकास कार्यात उत्कृष्ट काम करणाऱ्या जिल्हा परिषदा, पंचायत समित्यांसाठी विभाग व राज्य अशा दोन्ही स्तरावर यशवंत पंचायतराज अभियान ही पुरस्कार योजना सुरू केली आहे. ग्रामीण विकास क्षेत्रात यशवंत पंचायतराज हा सर्वसमावेशक पुरस्कार असल्याने अत्यंत महत्त्वाचा समजला जातो. शाश्वत विकास ध्येयांचे निकष व राष्ट्रीय पंचायत पुरस्कारांतर्गत अमरावती जिल्हा परिषद व तिवसा, अंजनगाव सुर्जी पंचायत समित्यांनी केलेली प्रगती विचारात घेऊन यशवंत पंचायतराज अभियान सन 2024-25 (मूल्यमापन वर्ष 2023-24) राबविण्यात आले होते. यामध्ये जिल्हा परिषद व जिल्ह्यातील पंचायत समिती यांनी सहभाग घेतला होता. विभागातून प्रथम क्रमांकावर आल्यामुळे राज्यस्तरावरून होणाऱ्या मूल्यमापन स्पर्धेकरिता जिल्हा परिषद व तिवसा, अंजनगाव व शेगाव पंचायत समिती पात्र झाली.




### सलग दुसऱ्यांदा बाजी

या अभिनव उपक्रमामध्ये पंचायत समिती व जिल्हा परिषदेने विविध विभागामार्फत वर्षभर राबविलेल्या शासनाच्या योजनांवर आधारित मूल्यमापन करण्यात आले. विभागस्तरीय समितीने जिल्हा परिषदेला काही महिन्यांपूर्वीच भेट देऊन जिल्हा परिषदेने केलेल्या मूल्यमापन प्रतवारी अहवालाची तपासणी केली. विभागस्तरीय समितीने केलेल्या तपासणीमध्ये अमरावती जिल्हा परिषदेने सलग दुसऱ्यांदा विभागातून प्रथम क्रमांक पटकाविल्याची माहिती सीईओ संजीता महापात्र यांनी दिली.

# आरोग्य यंत्रणांनी मानकांनुसार कार्य करावे - जिल्हाधिकारी सौरभ कटियार

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 2 ) –** जिल्ह्यात आरोग्यविषयक चांगले कार्य होत आहे. यात आता क्षयरोगमुक्त आणि आयुष्मान कार्ड वाटपात गती देण्याची गरज आहे. त्यासोबतच जिल्ह्यासाठी असलेल्या मानकानुसार आरोग्य यंत्रणांनी कार्य करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी केले.

जिल्हा एड्स प्रतिबंध आणि नियंत्रण समितीची सभा जिल्हाधिकारी कार्यालयात पार पडली. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी संजीता महापात्र, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. दिलीप सौंदळे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुरेश असोले, जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक अजय साखरे यांच्यासह स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते. जिल्हाधिकारी कटियार यांनी, राज्य शासनाच्या निर्देशानुसार एचआयव्ही बाधितांना परिवहन महामंडळाच्या बसेसच्या पासेसचे वितरण करण्यात येत आहे. त्या सर्वांना मिळत असल्याची खात्री करावी. त्यासोबतच इतरही योजनांचा लाभ देण्यासाठी प्रयत्न करण्यात यावेत. रक्तनमुने तपासणी करून एचआयव्हीबाधितांचा शोध घेण्यात येत आहे. यात आढलेल्या सर्वांना जोडून त्यांच्यावर उपचार करण्यात यावेत.



जिल्ह्यात धामणगावसह काही तालुक्यात मुलींचे प्रमाण कमी आहे. त्यामुळे लिंग गुणोत्तर कमी असणाऱ्या तालुक्यात गर्भधारणापूर्व आणि प्रसवपूर्व निदान तंत्र (लिंग निवड प्रतिबंध) अधिनियमाची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी. प्रामुख्याने सोनोग्राफी केंद्रावर लक्ष ठेवण्यात यावे. कायद्याचा वचक राहावा यासाठी कारवाई यशस्वी व्हावी. मुलींच्या जन्माचे स्वागत होण्यासाठी जनजागृती करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी कटियार यांनी दिले.




# ‘थामा’साठी थोडं थांबा



‘स्त्री’, ‘भेडिया’ आणि ‘मुंज्या’ नंतर निर्माता दिनेश विजन त्याच्या हॉरर कॉमेडी विश्वातील पुढचा चित्रपट म्हणजेच ‘थामा’ अभिनेता आयुष्मान खुरानाबरोबर बनवत आहे. या चित्रपटात आयुष्मान एका व्हॅंपायरची भूमिका साकारणार आहे. ‘स्त्री’ ने वरुण धवनच्या हॉरर-कॉमेडी ‘भेडिया’ त प्रवेश केला होता आणि ‘स्त्री २’ मध्ये वरुण धवन लांडग्याच्या भूमिकेत आला होता. त्याचप्रमाणे दिनेश विजन ‘थामा’ला त्याच्या मागील हॉरर-कॉमेडी चित्रपटाशी जोडणार आहे.

‘थामा’ मध्ये दिनेश विजनच्या भयपट विश्वात भर घालणारे पात्र म्हणजे लांडगा. चित्रपट वर्तुळातील वृत्तानुसार, ‘थामा’ चित्रपटात थामा आणि भेडिया यांच्यातील संघर्षाचा एक जबरदस्त सीन असेल. अलीकडेच, वरुण धवन आणि आयुष्मान यांनी मुंबईतील एका स्टुडिओमध्ये यातील काही महत्त्वपूर्ण दृश्यांचे चित्रीकरण पूर्ण केले. ‘मुंज्या’चे दिग्दर्शक आदित्य सरपोतदार यांच्याच दिग्दर्शनाखाली बनवण्यात येणाऱ्या ‘थामा’ मधील हा सीन भव्यदिव्य करण्यासाठी आंतरराष्ट्रीय तंत्रज्ञांची मदत घेण्यात आल्याचे बोलले जाते. हे दृश्य ‘थामा’साठी महत्त्वाचे असेल. दिनेश विजन यांनी गेल्या वर्षी ऑक्टोबर महिन्यात ‘थामा’ची घोषणा केली होती. हा चित्रपट रोमॅंटिक असण्यासोबतच हॉरर-कॉमेडीही असेल. चित्रपटाची कथा एका अपूर्ण प्रेमकथेभोवती फिरणारी आहे. आयुष्मान खुराना व्यतिरिक्त ‘सिकंदर’ अभिनेत्री रश्मिका मंदान्ना यात मुख्य भूमिकेत दिसेल. या चित्रपटात नवाजुद्दीन सिद्दीकी आणि परेश रावल हे देखील महत्त्वाच्या भूमिकेत दिसणार आहेत. हा चित्रपट यावर्षीच्या दिवाळीला थिएटरमध्ये प्रदर्शित होणार आहे.

‘थामा’ व्यतिरिक्त दिनेश विजन त्याच्या हॉरर आणि कॉमेडी विश्वात चित्रपटाचे सिक्वेल देखील बनवणार आहे. तो ‘स्त्री ३’ आणि ‘भेडिया २’ वरही काम करत आहे. ‘मुंज्या’चा क्लायमॅक्स पाहून त्याचा सिक्वेल येऊ शकतो, असे मानले जात आहे.



# जान्हवीने जिंकली अनेकांची मने

बॉलिवूड अभिनेत्री जान्हवी कपूर कायम चर्चेत असते. कधी बोल्ड लूकमुळे तर कधी सिनेमांमुळे ती आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरते. अलिकडेच जान्हवी कपूर एका कार्यक्रमात दिसली. यासाठी तिने अतिशय ग्लॅमरस लूक केला होता. या कार्यक्रमातील जान्हवीचे फोटो आणि व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत. दरम्यान, एका व्हिडीओने सर्वांचे लक्ष वेधले आहे. या व्हिडीओमध्ये जान्हवीने जॅकेटचा बंद सोडला असून फोटोसाठी पोझ दिली आहे.

ही चर्चा कोणत्या कार्यक्रमाची आहे, हे एव्हाना वाचकांना समजलेच असेल. होय, जान्हवी कपूरने नुकतीच ‘लॅक्मे फॅशन विक’ला हजेरी लावली होती. यावेळी तिने रॅम्प वॉक केला. तिने डिझायनर राहुल मिश्राने डिझाइन केलेला ड्रेस घातला होता. या काळ्या रंगाच्या बॉडीकॉर्न ड्रेसवर छोटी फुले आहेत. ड्रेसला स्ट्रॅपलेस ठेवण्यात आले आहे तर थाय हाय स्लिट कटदेखील देण्यात आला आहे. या काळ्या रंगाच्या बॉडीकॉर्न ड्रेसवर जान्हवीने न्यूड मेकअप केला तर केस मोकळे सोडले. या लूकमध्ये जान्हवी अतिशय हॉट दिसली आहे.

सोशल मीडियावर ‘लॅक्मे फॅशन विक’मधील अन्य काही व्हिडीओ व्हायरल झाले असले तरी जान्हवीच्या लूकनेच सर्वांचे लक्ष वेधले. जान्हवीने काळ्या बॉडीकॉर्न ड्रेसवर काळ्या रंगाचे जॅकेट घातले होते. रॅम्पवर वॉक करत असताना ती फोटोग्राफर्सला पोज देत होती. पोज देत असताना तिने जॅकेटचा बंद सोडला आणि बाजूला काढून टाकला. त्यानंतर काळ्या बॉडीकॉर्न ड्रेसमध्ये जान्हवी अतिशय हॉट दिसली. तिच्या या लूकचे चाहते कौतुक करत आहेत. कोणीतरी तिला बॉलिवुडची ‘फॅशन दिवा’ म्हटले तर कोणी ती मोठी सुपरस्टार बनण्याच्या मार्गावर असल्याचे म्हटले. एकूणच जान्हवी कपूरचा हा आतापर्यंतचा सर्वोत्तम लूक असल्याची चर्चा तिचे मनोधैर्य वाढवेल, हे नक्की.

# ‘सिकंदर’ची दमदार चाल



सलमान खानचा बहुप्रतिक्षित चित्रपट ‘सिकंदर’ प्रदर्शित झाला आणि त्याने प्रेक्षकांची मने जिंकलेली दिसली. ‘गजनी’ चित्रपटातून हिंदी चित्रपटसृष्टीत धुमाकूळ घालणारे एआर मुरुगदास तब्बल १७ वर्षांनी ‘सिकंदर’ द्वारे बॉलिवूडमध्ये परतले आहेत. हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर जबरदस्त कलेक्शन करत असून पहिल्याच दिवशी त्याने बोलबाला असणाऱ्या मल्याळम चित्रपटाला मागे टाकल्याचे समजले आहे.

चित्रपटाचा व्यवसाय आता गगनाला भिडत असून याच स्पर्धेत आता ‘सिकंदर’नेही एन्ट्री घेतली आहे. अर्थातच त्याचा परिणाम मल्याळम चित्रपट ‘एल२एम्पूरन’वर स्पष्टपणे झाला. पहिल्याच दिवशी ‘सिकंदर’मुळे ‘एल२एम्पुरन’ला देशांतर्गतच नव्हे तर जगभरातील बरेच कलेक्शन गमवावे लागले.

सलमान खान स्टारर ‘सिकंदर’ ने पहिल्या दिवशी देशांतर्गत बॉक्स ऑफिसवर जबरदस्त कमाई केली. या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर केवळ भारतात ३०.६ कोटी रुपये तर परदेशात १० कोटी रुपयांची कमाई केल्याचे आकडेवारी सांगते. त्यामुळे ‘सिकंदर’चे एकूण बॉक्स ऑफिस कलेक्शन ३५ कोटीच्या बरेच पुढे गेले आहे.

२७ मार्च रोजी थिएटरमध्ये प्रदर्शित झालेला ‘एल२एम्पूरन’ पहिल्या दिवसापासूनच देशांतर्गत बॉक्स ऑफिसवर तसेच जगभरात मोठी कमाई करत होता. पण सिकंदर येताच त्याच्या कमाईत घट झाली. मोहनलाल स्टारर चित्रपटाने चौथ्या दिवशी देशांतर्गत बॉक्स ऑफिसवर १४ कोटी रुपये कमावले. ‘एल२एम्पुरन’चे जगभरातील एकूण कलेक्शन ३८ कोटी रुपये आहे. मात्र आता या बाबतीत ‘सिकंदर’ने पुढे चाल घेतली आहे.

मात्र इथे लक्षात घ्यायला हवे की, ‘एल२एम्पुरन’ ने अवघ्या ४८ तासांमध्ये जगभरात १०० कोटी रुपयांचा गल्ला जमवल्यामुळे २०२५ च्या सर्वाधिक कमाई करणाऱ्या चित्रपटांच्या यादीत स्थान मिळवले आहे. पृथ्वीराज सुकुमारन दिग्दर्शित ‘एल२एम्पुरन’ ने पहिल्या चार दिवसांमध्येच जगभरात एकूण १७४.३५ कोटी रुपयांचा व्यवसाय केला तर भारतातही प्रेक्षकांची मने जिंकली. मात्र आता त्याची जागा सिकंदर घेताना दिसतो आहे.

# नवा सवंगडी मिळाला?



वैयक्तिक आयुष्यामुळे ग्लॅमरस मलाइका अरोरा नेहमीच चर्चेत असते. मात्र तिच्यासाठी अलिकडचे काही दिवस खूप कठीण होते. सुरुवातीला तिने बॉयफ्रेंड अर्जुन कपूरशी ब्रेकअप केले. काही महिन्यांपूर्वी तिच्या वडिलांचेही निधन झाले. मात्र या कठीण काळातून बाहेर पडल्यानंतर मलाइका आता पुढे चालली आहे.

अलिकडेच ती चेन्नई सुपर किंग्ज आणि राजस्थान रॉयल्स यांच्यातील आयपीएल २०२५ चा सामना पाहण्यासाठी स्टेडियममध्ये गेली होती. या काळात ती एका दिग्गज क्रिकेटपटूसोबत दिसली आणि अर्थातच त्यानंतर तिला पुन्हा एकदा प्रेम मिळाल्याची चर्चा सुरू झाली. राजस्थान रॉयल्सला पाठिंबा देण्यासाठी मलाइका अरोरा पोहोचली तेव्हा तिने आरआर जर्सीदेखील घातली होती आणि आयपीएल संघाचे माजी मुख्य प्रशिक्षक आणि श्रीलंकेचा माजी क्रिकेटपटू कुमार संगकारा यांच्यासोबत ती बसली होती. सोशल मीडियावर व्हायरल होणाऱ्या फोटोमध्ये दोघेही एकत्र बसलेले दिसल्यामुळे चर्चेला तोंड फुटले.

हा फोटो व्हायरल झाल्यानंतर, ‘छैया छैया गर्ल’ आणि श्रीलंकेचा लोकप्रिय क्रिकेटपटू कुमार संगकारा यांच्या डेटिंगबद्दल अटकळ बांधली जाऊ लागली आहे. एका वापरकर्त्याने विचारले, ‘ते डेटिंग करत आहेत का?’ तर एक म्हणाला, ‘शहरात आणखी एक जोडपे आहे.’ एकाने म्हटले, ‘अरोरा मॅडम संगासोबत इथे काय करत आहे, काही गोंधळ चालू आहे का?’ तर एकाने म्हटले ‘त्यांच्यात काही शिजते आहे का?’ एका व्यक्तीने या दोघांचे कौतुकही केले. त्यापैकी एकाने तर असेही म्हटले की, संगा लवकरच तिच्याशी लग्न करेल. एकंदरच सध्या सोशल मीडियावर अशा असंख्य प्रतिक्रियांचा पाऊस पडताना दिसतो आहे.

यापूर्वी मलाइका अरोरा डेटिंग करत असल्याच्या चर्चा होत्याच. तिचे नाव स्टायलिस्ट राहुल विजयशीही जोडले जात होते.



# कपिल पुन्हा येतोय

नुकतीच देशभरात ईद साजरी झाली. दरम्यान प्रसिद्ध कॉमेडियन कपिल शर्माच्या एक पोस्टने सर्वांनाच आश्चर्यचकित करुन टाकले. त्याने ईद मुबारकच्या शुभेच्छा देणारी एक पोस्ट शेअर केली ज्यामध्ये तो पत्नीबरोबर मुस्लिम वराच्या वेशात दिसला. म्हणजेच त्याने एका मुस्लिम मुलीशी लग्न केले आहे. अर्थातच खऱ्या आयुष्यात नाही तर रील लाईफमध्ये...!

कपिल शर्मा लवकरच मोठ्या पडद्यावर विनोदाचे रंग भरण्यासाठी येत आहे. तब्बल १० वर्षांनंतर त्यांच्या ‘किस किस को प्यार करूं’ या चित्रपटाचा सिक्वेल येत आहे. ताज्या पोस्टमध्ये ‘किस किसको प्यार करूं २’ मधील या अभिनेत्याचा पहिला लूक समोर आला आहे.

**कपिल शर्मा वर बनला**

या पोस्टरमध्ये कपिल ऑफ व्हाइट शेरवानी आणि सेहरा घातलेल्या वराच्या भूमिकेत दिसत आहे. तसेच त्याचा चेहरा फिकट दिसत आहे. कपिलच्या शेजारी त्याची पत्नी असून तिने निळा लेहेंगा आणि बुरखा घातला आहे. पोस्टरमध्ये कपिलच्या ऑन-स्क्रीन पत्नीचा चेहरा दिसत नाही. पोस्ट शेअर करताना कपिल शर्माने कॅप्शनमध्ये ‘ईद मुबारक’ असेही लिहिल्याचे दिसले. कपिल शर्माचा हा लूक पाहून चाहत्यांना आशा आहे की, हा चित्रपट ‘किस किस को प्यार करूं’ या पहिल्या चित्रपटाप्रमाणेच मजेदार असेल. अर्थातच सोशल मीडियावर काहींनी त्याला चिडवलेही आहे. २०१५ मध्ये प्रदर्शित झालेल्या ‘किस किस को प्यार करूं’ या चित्रपटात कपिलने चार लग्ने केली होती, हे वाचकांना ज्ञात असेलच.

यापूर्वी कपिल शर्माचा एक व्हिडिओ ‘किस किस को प्यार करूं २’ च्या सेटवरून लीक झाला होता. त्यामध्ये तो एका वेगळ्याच लूकमध्ये दिसला होता. तेव्हा तो भोपाळमध्ये चित्रपटाचे चित्रीकरण करत होता. लीक झालेल्या व्हिडिओमध्ये कपिल सरदाराच्या वेशात दिसत होता. एका ठिकाणी तो विंटेज कार चालवतानाही दिसला.

कलाकारांबद्दल बोलायचे झाले तर, या चित्रपटात त्याच्याबरोबर अभिनेत्री पारुल गुलाटी, ‘आश्रम’ फेम बबिता भाभी म्हणजेच त्रिधा चौधरी आणि ‘बिग बॉस’ फेम अभिनेत्री आयेशा असेल. यांच्यासोबत मनजोत सिंग, आणि कॉमेडियन जेमी लिव्हर देखील या चित्रपटात दिसणार आहेत. रिलीजची तारीख अद्याप जाहीर झालेली नाही.



# कशी असेल ‘...जमवा जमवी?’

चित्रपट आणि प्रेमकथा यांचं एक वेगळचं नातं असतं. अनेक चित्रपटांमधून ते बघायला मिळतं. एखादी चिरपरिचित कथा कसलेल्या कलाकारांच्या माध्यमातून पडद्यावर उलघडते तेव्हा प्रेक्षक भरभरुन दाद देतात. प्रेमाची अशीच एक व्याख्या लवकरच आपल्याला अनुभवायला मिळणार आहे. राजकमल एंटरटेनमेंट प्रस्तुत, लोकेश गुप्ते लिखित आणि दिग्दर्शित, अशोक सराफ आणि वंदना गुप्ते यांच्या प्रमुख भूमिका असणारा ‘अशी ही जमवा जमवी’ नामक नवा मराठी चित्रपट लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. काही दिवसांपूर्वीच या चित्रपटाची घोषणा करण्यात आली होती आणि नुकतेच त्याचे पहिले पोस्टरही प्रदर्शित करण्यात आले. या चित्रपटात प्रेक्षकांना नव्या-जुन्या कलाकारांचा सुंदर मेळ पाहायला मिळणार आहे. पोस्टर पाहून प्रेक्षकांमध्ये उत्सुकता निर्माण झाली आहे. या चित्रपटात अनेक वर्षांनी अशोक सराफ आणि वंदना गुप्ते ही जोडी पडद्यावर एकत्र दिसणार आहे. याशिवाय ओमकार कुलकर्णी आणि तनिष्का विशे ही नवी जोडीही झळकणार आहे. यांच्या बरोबर चित्रपटात सुनील बर्वे, चैत्राली गुप्ते, मिलिंद फाटक, सुलेखा तळवलकर, पुष्कराज चिरपुटकर असे लोकप्रिय कलाकारही महत्त्वाच्या भूमिकेत बघायला मिळतील. लोकेश गुप्ते यांनी या चित्रपटाचे लेखन आणि दिग्दर्शन केले आहे. तेव्हा मराठी रसिकांना हा चित्रपट आनंद देईल, अशी आशा आहे.

# हम साथ-साथ है!



घटस्फोटाच्या बातम्यांमुळे अभिषेक बच्चन आणि ऐश्वर्या राय काही काळापूर्वी चर्चेत होते. अर्थात या जोडप्याने अफवांवर कोणतेही विधान केले नाही. पण त्यानंतर दोघेही अनेक वेळा एकत्र दिसले. अलिकडेच अभिषेक-ऐश्वर्या मुलगी आराध्यासह एका लग्नाला उपस्थित होते. अभिनेत्रीची चुलत बहीण श्लोका शेट्टीच्या भावाच्या लग्नाला अभिषेक-ऐश्वर्या उपस्थित होते. फोटोंमध्ये आराध्या पांढरा लेहेंग्यामध्ये सुंदर दिसत आहे. आराध्याने तिचा देसी लूक कमीत कमी मेकअपसह सांभाळला आहे. या सोहळ्यात ऐश्वर्या हिरव्या रंगाच्या अनारकली सूटमध्ये दिसली तर अभिषेक पीच रंगाचा इंडो-वेस्टर्न सूट परिधान करताना दिसला.

त्याआधी मुंबईत दिग्दर्शक आशुतोष गोवारीकर यांचा मुलगा कोणार्कच्या लग्नालाही ऐश्वर्या आणि अभिषेक बच्चन उपस्थित होते. ऐश्वर्याने आशुतोष गोवारीकर दिग्दर्शित जोधा अकबर (२००८) चित्रपटात काम केले होते. डिसेंबरच्या सुरुवातीलाही दोघे एका हाय-प्रोफाइल पार्टीत एकत्र दिसले होते.

त्यांच्या घटस्फोटाच्या अफवा पसरू लागल्या तेव्हा दोघांनीही अनंत-राधिकाच्या लग्नात वेगवेगळा प्रवेश केल्यामुळे आणखी हवा मिळाली. इतकेच नव्हे तर संपूर्ण लग्नात ते एकत्र दिसले नव्हते. यानंतर ऐश्वर्या मुलीबरोबर सुट्टीवर गेली. अर्थातच तेव्हाही अभिषेक त्यांच्याबरोबर नव्हता.

# सासरी सुखात आहे



बॉलिवूड अभिनेत्री सोनाक्षी सिन्हा आणि झहीर इकबाल हे जोडपं नेहमीच चर्चेत असतं. नुकतीच या दोघांनी लग्नानंतरची पहिली ईद साजरी केली. फोटोंमध्ये ते एकमेकांसोबत मस्ती करताना दिसतात. या अभिनेत्रीने युट्यूबवर लाइव्ह सेशन दरम्यान वैवाहिक आयुष्याविषयी भाष्य केले आहे. सध्या त्याची बरीच चर्चा आहे.

सोनाक्षी सिन्हानं यावेळी माहेर आणि सासरच्या लोकांमध्ये असणाऱ्या अंतराविषयी सांगितलं आहे. एका चाहत्यानं तिला माहेर आणि सासरमध्ये काय फरक आहे? असा प्रश्न केला होता. त्यावर उत्तर देत सोनाक्षीनं सांगितलं की, तिच्यावर घरातील सगळेच खूप प्रेम करतात. पण सासरचे लोक तिला मुलीसारखी वागणूक देतात आणि खूप प्रेम करतात. त्यामुळे आधीपासूनच त्यांच्या कुटुंबाचा एक भाग असल्यासारखे वाटत असल्याचे ही अभिनेत्री सांगते.

सोनाक्षी सिन्हानं चाहत्याला उत्तर देत सांगितलं की, ‘एका मुलगी म्हणून माझ्या घरात अगदी आनंदानं, प्रेमानं, राहत होते. पण सासरच्या घरी ते मला मुलीपेक्षा जास्त प्रेम देतात. मी खरंच भाग्यवान आहे की असं सासरं मिळालं आहे. कोणाची तरी मुलगी आपल्या घरी आहे, याचे सासरच्या लोकांना भान आहे. त्यामुळे ते प्रत्येकवेळी थोडं जास्तच प्रेम करतात आणि मी कायम याच कुटुंबाचा भाग होते अशी जाणीव करून देतात. त्यामुळे जणू मी आधीपासूनच या घरात राहता असल्यासारखे वाटते... या दोघांनी जून २०२४ मध्ये लग्न केलं. पण तिचे भाऊ या लग्नात सहभागी झाले नव्हते. शत्रुघ्न सिन्हा आणि पूनम सिन्हा हे दोघेच लेकीला आशीर्वाद देण्यासाठी आले होते. तेव्हा आता बहीण सासरी आनंदात असल्याचे समजल्यानंतर तरी तिचे भाऊ त्यांच्या आनंदात सहभागी होतील, अशी आशा करु या.

# नक्षल्यांकडून युद्ध विराम प्रस्ताव

**■ महासागर प्रतिनिधी**
**नागपूर, दि. २ :**

छत्तीसगड, महाराष्ट्रातील गडचिरोली, तेलंगणा, ओडिशा आणि झारखंड येथे नक्षलवादाविरोधात सुरु असलेल्या आक्रमक कारवायांमुळे घाबरलेल्या नक्षल्यांनी केंद्र सरकारपुढे युध्द विरामाचा प्रस्ताव ठेवला आहे.

केंद्रीय समिती सदस्य अभय उर्फ सोनू भुपती याने यासंदर्भात माध्यमांना प्रसिद्धी पत्रक पाठवून कारवाया रोखण्याचे सरकारला आवाहन केले आहे. दोन दशकानंतर पहिल्यांदाच नक्षल्यांनी अशा प्रकारे शांतीप्रस्ताव पुढे केल्याने केंद्र सरकारच्या भूमिकेकडे लक्ष लागले आहे.



२४ मार्च रोजी हैद्राबाद येथे एक गोलमेज बैठक घेण्यात आली होती. त्यात मध्य भारतात सुरक्षा दल आणि नक्षलवाद्यांमध्ये सुरु असलेला संघर्ष थांबवण्यात येऊन शांतीवार्ता केली पाहिजे, असे ठरविण्यात आले.

गृहमंत्री अमित शहा यांनी मार्च २०२६ पर्यंत देशातून नक्षलवाद हद्दपार करणार, अशी घोषणा केल्यानंतर छत्तीसगड, गडचिरोली, तेलंगणा, ओडीशा आणि झारखंड राज्यात नक्षलविरोधी अभियान अधिक गतिमान करण्यात आले आहे. यामुळे १५ महिन्यात झालेल्या चकमकीत तब्बल ४०० हून अधिक नक्षलवादी ठार झाले. शेकडो कारागृहात आहेत. इतकेच नव्हे तर यात अनेक निरपराध आदिवासी मारल्या गेल्याचा दावाही पत्रकात केल्या गेला आहे. दरम्यान, ही चळवळ आता अधिक खिळखिळी झाल्याने नक्षल्यांनी तसा प्रस्ताव दिल्याची चर्चा आहे.

## वक्फ बोर्डाची संपत्ती तुमच्या पप्पाची जहागीर नाही...

**■ महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. २ :**

इम्तियाज जलील यांची टीका



बहुचर्चित वक्फ दुरुस्ती विधेयकाला मुस्लीम समाजाकडून विरोध दर्शवण्यात येत आहे. यावर एमआयएमचे माजी खासदार इम्तियाज जलील यांनीही प्रतिक्रिया दिली आहे.

वक्फ बोर्डाची संपत्ती तुमच्या पप्पाची जहागीर नाही, अशा शब्दांत इम्तियाज जलील यांनी सरकारवर हल्ला चढवला. तुम्हाला तुमच्या पद्धतीने निर्णय घ्यायचा होता तर जॉईंट पार्लमेंटरी कमिटी का तयार केली? असा सवालही जलील यांनी सरकारला केला.

इम्तियाज जलील म्हणाले, वक्फ बोर्डासंदर्भात जॉईंट पार्लमेंटरी कमिटी तयार करण्यात आली होती आणि त्यामध्ये आमच्या पार्टीचे असदुद्दीन ओवैसी यांनी त्या ठिकाणी मोठी कामगिरी बजावली होती. जे समितीने निर्णय घेतले आहे ते रद्द करण्यात आले आहेत. जर तुम्हाला समितीचे निर्णय मान्यच नव्हते..? तर हे नाटक का केले? लोकांचे पैसे आणि वेळ का वाया घातला? असे अनेक सवाल त्यांनी उपस्थित केले आहेत.

## हिंदू शेतकरी आणि हिंदू देवस्थानच्या जमिनी परत करणार

**■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २ :**

वक्फ बोर्ड सुधारणा विधेयक मंजूर झाल्यानंतर महाराष्ट्र सरकार मोठा निर्णय घेण्याची तयारी करत असल्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी म्हटले आहे. हे विधेयक मंजूर झाल्यानंतर वक्फ बोर्डाच्या माध्यमातून हिंदू शेतकरी आणि हिंदू देवस्थानच्या ज्या जमिनी ताब्यात घेण्यात आल्या आहेत, त्या परत करण्यासाठी सरकार प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

बावनकुळे म्हणाले की, मी आपल्याला दाव्याने सांगतो की, संसदेमध्ये वक्फ बोर्ड सुधारणा विधेयक मंजूर झाल्यानंतर त्याच्यात काय काय तरतुदी मंजूर झाल्या ते पाहण्यात येईल. त्यानंतर महाराष्ट्र सरकार देखील पुढाकार घेऊन हिंदू शेतकऱ्यांच्या, हिंदू मंदिरांच्या आणि संस्थानाच्या तसेच मुस्लिम समाजाच्या देखील ज्या जमिनी वक्फ बोर्डाने मोगलाई करुन बळजबरीने ताब्यात घेतल्या आहेत, त्या परत करण्यासाठी आम्ही पुढाकार घेऊ. यासाठी देवेंद्र फडणवीस यांचे महाराष्ट्र सरकार नक्कीच पुढाकार घेईल, ज्या जमिनी



महसुल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे सुतोवाच

जबरदस्तीने ताब्यात घेण्यात आल्या आहेत, त्या परत केल्या जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.

वक्फ बोर्ड सुधारणा विधेयकावरील मतदानावरून भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी उद्धव ठाकरे यांच्या गटावर टीका केली आहे. उद्धव ठाकरे यांनी बाळासाहेब ठाकरे यांचे विचार सोडले नसतील तर त्यांनी वक्फ बोर्डाच्या विधेयकाच्या बाजूने मतदान करण्याचे आवाहन केले आहे.

या संदर्भात वॉक आउट करणे म्हणजे वक्फ सुधारणा विधेयकाच्या विरोधात मतदान करणे आहे. असे देखील ते म्हणाले. त्यामुळे वॉक आउट न करता विधेयकाच्या बाजूने मतदान करण्याचे आव्हान देखील त्यांनी दिले आहे.

## उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर महानिर्मिती सज्ज

**■ महासागर प्रतिनिधी**
**नागपूर, दि. २ :**

उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर विजेची मागणी वाढते, यासाठी दरवर्षी महानिर्मितीतर्फे सूक्ष्म नियोजन करण्यात येते. सद्य स्थितीत राज्याची विजेची एकूण मागणी २९,५०० मेगावॅटच्या घरात पोहोचली असून यासाठी महानिर्मिती सज्ज आहे.

महानिर्मितीने मार्च २०२५ मध्ये मासिक औष्णिक महत्तम ५,३२८ दशलक्ष युनिट्स इतके विक्रमी वीज उत्पादन केले तर उरण वायू वीज केंद्राने मागील ५ वर्षांतील सर्वात जास्त म्हणजे २,४७३ दशलक्ष युनिट्स वीज उत्पादन केले आहे.

महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोगाने सन २०२४-२५ मध्ये निर्धारित केलेल्या लक्ष्यास अनुसरून महानिर्मितीच्या अपारंपारिक ऊर्जा, पुणे मंडळाने ४५४.४० दशलक्ष युनिट्स वीज उत्पादनाचे लक्ष्य गाठले आहे. एकूणच सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात ६१,४५६ दशलक्ष युनिट्स इतकी विक्रमी वीजनिर्मिती झाली असून सन २०२३-२४ चा ६१,४३९ दशलक्ष युनिट्स वीजनिर्मितीचा विक्रम तोडला आहे, हे विशेष.

महानिर्मितीने सातत्याने उच्चतम कामगिरी नोंदवत अनेक उच्चांक गाठले आहेत. औष्णिक संचांची उपलब्धता, आवश्यक देखभाल-दुरुस्ती, भांडवली स्वरूपाची कामे याकडे विशेष भर दिल्याने यावर्षी महानिर्मितीच्या १५ संचांतून १०० दिवसांपेक्षा जास्त अखंडित वीज उत्पादन झालेले आहे.

प्रभावी इंधन व्यवस्थापनाची जोड दिल्याने वीज उत्पादनासाठी सुमारे २२.५ लक्ष मेट्रिक टन इतका कोळसा साठा सद्य परिस्थितीत उपलब्ध आहे आणि त्यामध्ये वाढ करण्यासाठी महानिर्मितीचा विविध स्तरावर पाठपुरावा सुरु आहे. यंदा वीज उत्पादनासाठी धरणांमध्ये पुरेसा जल साठा उपलब्ध असल्याने जनतेला आवश्यक मागणीनुसार अखंडित वीज उत्पादन करण्यासाठी महानिर्मिती प्रयत्नशील आहे.

मुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री यांचे निर्देशानुसार महानिर्मितीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, संचालक मंडळ आणि अधिकारी- तंत्रज्ञ- कर्मचारी राज्यातील जनतेला मागणीनुसार अखंडित वीज उत्पादन देण्यासाठी कटिबद्ध आहेत.

## बल्लारपूर तहसीलदार गायकवाड लाच प्रकरणी अडचणीत?

**■ महासागर प्रतिनिधी, चंद्रपूर, दि. २ :**

बिल्डींग मटेरीअल सप्लायर याच्याकडे दोन लाख २० हजारांची लाच मागून, १ लाख १९ हजार ९०० रू. स्विकारले आणि उर्वरीत १ लाख रुपए देण्यासाठी तगादा लावला. या प्रकरणाची तक्रार लाचलुचप्रत प्रतिबंधक विभागाकडे करताच बल्लारपूरचे तहसीलदार अभय अर्जुन गायकवाड व तलाठी सचिन रघुनाथ पुकळे यांच्या विरूध्द गुन्हा नोंद करण्यात आला आहे. दरम्यान तहसीलदार गायकवाड यांना ताब्यात घेण्यात आले असून तलाठी सुटीवर असल्याने त्याचा शोध सुरू आहे.

बल्लारपुर तालुक्यातील मौजा कोठारी येथील तक्रारदार यांचा बिल्डींग मटेरिअल सप्लायर चा व्यवसाय आहे. त्यांची मौजा कवडजई येथे शेती असून २ ट्रॅक्टर व १ जे.सी.बी. च्या सहाय्याने शेतातील माती/मुरूम काढून शेतजमिन सपाटीकरणाचे काम सुरू होते. कवडजई साजाचे तलाठी सचिन पुकळे व बल्लारपूरचे तहसीलदार अभय गायकवाड यांनी तक्रारदार यांना माती/मुरूम काढण्याची परवानगी नसल्याने ट्रॅक्टर व जे.सी.बी. जप्त न करण्याकरीता २ लाख रुपये आणि तलाठी करीता २० हजार रुपये असे एकुण २ लाख २० हजार रुपये लाचेची मागणी केली.

त्याच दिवशी तलाठी सचिन पुकळे व तहसीलदार गायकवाड यांनी तक्रारदाराकडून १ लाख १९ हजार ९०० रू. स्विकारले. उर्वरित १ लाख रू. देण्याकरीता तहसीलदार व तलाठी यांनी तक्रारदार यांचेकडे तगादा लावण्याने तक्रारदार यांनी लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय चंद्रपूर येथे तक्रार दिली. प्रकरणाची पडताळणी केल्यानंतर काल १ एप्रिल रोजी बल्लारपूर पोलीस ठाण्यात आरोपी लोकसेवक यांचे विरूध्द गुन्हा नोंद करण्यात आल्याची माहिती आहे.

## हिंगणी उपकेंद्राला मिळाले आयएसओ मानांकन

**■ महासागर प्रतिनिधी, वर्धा, दि. २ :**

वीज ग्राहकांना गुणवत्तापूर्ण आणि अखंडित सेवा देण्यासाठी उपकेंद्राचे अत्यंत उत्कृष्टरित्या सक्षमीकरण आणि नूतनीकरण करण्यात आल्यामुळे महावितरणच्या नागपूर परिमंडल अंतर्गत असलेल्या वर्धा जिल्ह्यातील हिंगणी या ३३/११ केव्ही विद्युत उपकेंद्राला आयएसओ ९००१:२०१५ आणि आयएसओ ४५००१:२०१८ चे मानांकन मिळाले आहे. विशेष म्हणजे आर्वी आणि पिंपळगाव पाठोपाठ आतएसओ नामांक्न मिळविणारे हिंगणि हे वर्धा जिल्हातील महावितरणचे तिसरे उपकेंद्र ठरले.



हिंगणी उपकेंद्रातूवरील सर्व वीज ग्राहकांना नियमीत वीज वितरण, रोहीत्रांच्या ग्राहक सेवांचे संचालन आणि देखभाल यासाठी मानांकन देण्यात आले आहे. महावितरणच्या इज ऑफ लिव्हिंग अर्थात ग्राहकांचे जीवनमान उंचावण्यासाठी वीज हा अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. त्यामुळे ग्राहकांना दर्जेदार वीजपुरवठा करणे ही महावितरणची जबाबदारी आहे.

आयएसओ मानांकनानुसार उपकेंद्रातील उत्कृष्ट कार्याचा थेट लाभ ग्राहकांना उच्च दर्जाची वीज सेवा देण्यासाठी होणार आहे. या उपकेंद्रासाठी कर्मचाऱ्यांनी स्वयंस्फूर्तीने केलेल्या उत्कृष्ट कामातून प्रेरणा घेत इतर विभागातील अधिकारी, कर्मचारी यांनी आपआपल्या उपकेंद्रात पूर्ण क्षमतेने उत्कृष्ट काम केल्यानेच हे मानांकन मिळालेले आहे.

नागपूर परिमंडलाचे मुख्य अभियंता दिलीप दोडके आणि वर्धा प्रविभागाच्या अधीक्षक अभियंता स्मिता पारखी यांच्या मार्गदर्शनाखाली वर्धा विभागाचे कार्यकारी अभियंता स्वप्निल गोतमारे, अतिरिक्त कार्यकारी अभियंता राजेश मछले, सेलू उपविभागाचे उपकार्यकारी अभियंता संदीप शिरपूरकर, कनिष्ठ अभियंता गौरव वाटकर तसेच हिंगणी उपकेंद्रातील सर्व यंत्रचालक, तंत्रज्ञ, सुरक्षारक्षक व बाह्य स्त्रोत कर्मचारी यांनी अथक प्रयत्न केले आहेत. महावितरणचे प्रादेशिक संचालक परेश भागवत यांनी मुख्य अभियंता दिलीप दोडके, अधीक्षक अभियंता स्मिता पारखी यांचेसोबत तिनही विभागातील कार्यकारी अभियंते, तंत्रज्ञ आणि कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले आहे.